७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. ११ मार्च २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## AI स्कॅमवर कॉमेडियन भारती सिंहची आगपाखड

पुणे (दै. संध्या) : स्टार कॉमेडियन भारती सिंह आपल्या विनोदी शैलीसाठी ओळखली जाते. तिचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. ती सोशल मीडियावर कायम चर्चेत असते. दैनंदिन घडणाऱ्या गोष्टी ती व्लॉगद्वारे चाहत्यांसोबत शेअर करत असते. अलिकडेच तिनं सोशल मीडियावर एका स्कॅमबाबत माहिती शेअर केली आहे. भारतीनं सांगितलं की, एआयद्वारे तिच्या आवाजाचा वापर करुन, ऑनलाइन स्लिमिंग प्रॉडक्ट्स विकले जात असल्याची माहिती दिली. यामुळे सोशल मीडियात खळबळ उडाली आहे. तिनं आपला संताप व्यक्त केला. कॉमेडिअन भारती सिंग सध्या एका नवीन प्रकारच्या ऑनलाइन घोटाळ्यामुळे चर्चेत आहे. काही स्कॅमर्स एआयद्वारे तिच्या आवाजाचा वापर करुन स्लिमिंग प्रॉडक्ट्स विकण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेकांनी या बनावट जाहिरातीवर विश्वास ठेवला. दरम्यान, भारतीला याची माहिती मिळताच तिनं आपल्या चाहत्यांना सावध केले आहे. तिनं व्हिडिओ शेअर करत ही जाहिरात फेक असल्याचं सांगितलं.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## मिरज पंचायत समितीवर महाविकास आघाडीची सत्ता

सांगली (दै. संध्या) : नाट्यपूर्ण घडामोडीनंतर मिरज पंचायत समितीची सत्ता महाविकास आघाडीच्या हाती आली. सभापती निवडीमध्ये महाविकास आघाडीने शिवसेना शिंदे गटाला सोबत घेउन सत्तांतर घडवले. आमदार सुरेश खाडे यांच्या नेतृत्वाखालील भाजपला सत्तेच्या जवळ पोहचूनही पदाधिकारी निवडीत पराभूत व्हावे लागले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या तन्वी कमलेकर या २१ वर्षाच्या तरूणीच्या गळ्यात सभापती पदाची माळ पडली. भाजपचे आमदार खाडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपने मिरज तालुक्यातील पंचायत समितीच्या २२ पैकी १० जागा पटकावत सर्वात मोठा पक्ष भाजप ठरला होता. मात्र, अन्य पक्षांनी भाजपविरोधात निवडणूक लढवून १२ जागांवर विजय संपादन केला होता. यामध्ये काँग्रेस ३, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ३, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ४ आणि शिवसेना शिंदे गट २ असे संख्याबळ होते.

## ई-कचरागाड्या धुळखात पडून

अहिल्यानगर (दै. संध्या) : जिल्हा परिषदेने गावोगावच्या कचरा संकलनासाठी एकत्रित खरेदी करून दोन टप्प्यात ३६७ ई-कचरागाड्यांचे (बॅटरीवर चालणाऱ्या) वितरण ग्रामपंचायतींना केले मात्र त्यातील १३० गावातील ई-कचरागाड्या वर्षभरातच धुळखात पडून राहिल्या किंवा अनेक गाड्यांच्या बॅटऱ्या चोरीला गेल्या, वापर नसल्याने बॅटरी निकामी झाल्या आहेत. ग्रामपंचायतींचे ट्रॅक्टरमार्फत कचरा संकलन सुरू असतानाही तेथे बॅटरीवरील गाड्या दिल्या गेल्या आहेत. बॅटरीच्या गाड्या बंद पडल्याने काही ग्रामपंचायतींनी कचरा वाहतुकीसाठी पत्र्याचा पेटारा लावलेल्या सायकली घेतल्या आहेत. परिणामी ई- कचरा गाड्यांवर केलेला कोट्यवधी रुपयांचा खर्च १३० गावातून कचऱ्यात गेल्याचे आढळून येत आहे.

## २री ते ८वीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

पुणे (दै. संध्या) : यंदाही राज्यातील शाळा एप्रिल अखेरपर्यंत सुरू राहणार आहेत. दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या 'संकलित मूल्यमापन चाचणी २'चे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण (एससीईआरटी) परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, तृतीय भाषा या विषयांची परीक्षा घेतली जाणार आहे. शाळांना सकाळ किंवा दुपारच्या सत्रात परीक्षा आयोजित करण्याचे स्वातंत्र्य शाळांना देतानाच वेळापत्रकात बदल करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर यांनी या बाबतविभागीय उपसंचालक, विभागीय विद्या प्राधिकरण, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, महापालिका प्रशासन अधिकारी, शिक्षण निरीक्षकांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत.

### कायदेशीर तरतुदी तपासण्यासाठी DG च्या नेतृत्वात समिती, मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

# सोशल मीडियातील बदनामीवर सरकार कठोर

मुंबई (दै. संध्या)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सोशल मीडियाच्या माध्यमातून होणाऱ्या बदनामीविरोधात कायदेशीर तरतूद करण्यासाठी पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वात एक समिती स्थापन करण्याची घोषणा केली. ही समिती सरकारला या प्रकरणी एखादा नवा कायदा किंवा आहे त्याच कायद्यात एखादी दुरुस्ती करण्याची गरज आहे काय? हे पडताळून तशी शिफारस सरकारला करेल, असे ते म्हणालेत. सरकारच्या या घोषणेमुळे सोशल मीडियातील बदनामीकारक मजकुराला लगाम घातला जाण्याची शक्यता आहे.

भाजप आमदार राहुल कूल यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या नाहक बदनामीचा मुद्दा सभागृहाच्या पटलावर मांडला. सोशल मीडियावर बदनामी करण्यासाठी एक प्रचंड यंत्रणा कार्यरत असते. फेक अकाउंट काढले जातात. त्यामुळे जसे व्यक्तीला भाषण स्वातंत्र्य आहे, तसे प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्यही आहे. ही अभिव्यक्ती जपण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. पण सोशल मीडियावरील फेक अकाउंटद्वारे बदनामी करण्यासाठी सरकार काही कायदा करणार आहे का? असा माझा प्रश्न आहे, असे ते म्हणाले.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी त्यांच्या प्रश्नाला उत्तर दिले. ते म्हणाले, सायबर गुन्हे केवळ महाराष्ट्र नव्हे तर जगभरात वाढले आहेत. सध्या डिजिटलायझेशन वाढल्यामुळे दरोडे कमी आणि सायबर चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. हे प्रकार टाळण्यासाठी जे काही तंत्रज्ञान आवश्यक आहे ते मुख्यमंत्र्यांनी आपल्या महाराष्ट्रात उपलब्ध केले आहे. किंबहुना संपूर्ण आशियात सर्वात चांगली सुविधा आपल्याकडे उपलब्ध आहेत, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या चर्चेत हस्तक्षेप करत सोशल मीडियाद्वारे कोणत्याही पुराव्याविना होणारी बदनामी टाळण्यासाठी पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वात एक समिती स्थापन करण्याची घोषणा केली. ते म्हणाले, सोशल मीडियाचा वापर करून कोणत्याही पुराव्याविना बदनामी करणे हे खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. समाजातील सर्वच स्तरातील लोकांना त्याचा सामना करावा लागतो. महिलांना तर विशेषतः करावा लागतो. यासंदर्भात कायद्यात काही तरतूद करता येईल का? हे पडताळून पाहण्यासाठी राज्याच्या

पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वात एक समिती स्थापन केली जाईल. त्यांच्या शिफारशीनुसार, पुढील कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या चर्चेत हस्तक्षेप करताना सरकारला एक सूचना केली. ते म्हणाले, यासंदर्भात एक सूचना आहे की, माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या सेक्शन 66 ए मध्ये त्यावेळी सोशल मीडियावर बदनामीकारक मजकूर टाकला तर अटक करण्याची तरतूद होती. त्यानंतर आपण ही तरतूद शिथील करून रद्दबातल केली. आता हे वाढते प्रमाण पाहता ही तरतूद पुन्हा आणता येईल का हे पाहण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांचा सूचनेला सकारात्मक प्रतिसाद

विधानसभा अध्यक्षांच्या या सूचनेला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ते म्हणाले, प्रस्तुत कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाने काही निर्णय दिले. त्या निर्णयामुळे या कायद्याचा प्रभावीपणा कमी झाला आहे. पूर्वी आयटी ॲक्टसोबत आपण बीएनएस लावायचो. तो ही आता लावता येत नाही. यासंदर्भातही सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेत. त्यामुळे आता या गोष्टीला आळा घालण्यासाठी तुम्ही केलेली सूचनाही या समितीच्या कार्यकक्षेत देऊन आपल्याला स्टेट ॲक्ट किंवा स्टेट अमेंडमेन्ट जे काही करता येईल ते आपण करू, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## दादांच्या अपघाताची सीबीआय चौकशी व्हावी या मागणीची दखल का नाही?

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झालं. महाराष्ट्रासाठी हा खूप मोठा धक्का ठरला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार आणि अजित पवारांचे पुतणे रोहित पवार यांनी आत्तापर्यंत तीनवेळा पत्रकार परिषद घेऊन VSR कंपनीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. अजित पवारांचा मृत्यू अपघात होता की घातपात? हे सत्य महाराष्ट्रासमोर आलं पाहिजे अशी मागणी त्यांनी केली आहे. तसंच आज रोहित पवार यांनी सीबीआय चौकशीबाबत अजून केंद्राने आदेश का दिले नाहीत असाही सवाल केला आहे. राज्य व केंद्र सरकार एकाच विचाराचे डबल इंजिन सरकार असेल तर राज्य सरकारने पाठवलेले प्रस्ताव केंद्र सरकार लगेच मान्य करतं असं वाटत होतं.. पण अजित दादांसारख्या लोकनेत्याच्या अपघाताच्या सीबीआय चौकशीची राज्य सरकारने मागणी करूनही केंद्र सरकार दखल घेत नाही, कुठेतरी मनाला पटणारे नाही. सुशांत सिंह आत्महत्येच्या प्रकरणात बिहार सरकारने विनंती केल्यावर दोनच दिवसात केंद्राने सीबीआय चौकशी सुरू केली होती, तीच तत्परता अजित दादांच्या विषयात का नाही ? आज राष्ट्रवादी अजित दादा पक्षाच्या आमदारांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सीबीआय चौकशीबाबत स्मरणपत्र दिलं याबद्दल आभार! परंतु सरकारमध्ये राहून सरकारकडेच स्मरणपत्र देण्याची वेळ का येत आहे ? याचा विचार करायला हवा.

## देशातील अनेक राज्यांत व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद

नवी दिल्ली (दै. संध्या)

- इसेंशियल कमोडिटी ॲक्ट लागू, हॉटेल-रेस्टॉरंट बंद होण्याची वेळ, मिळत नाहीये गॅस



केंद्र सरकारने देशभरात 'अत्यावश्यक वस्तू कायदा 1955' लागू केला आहे. हॉर्मुझ जलमार्गातून होणारा गॅस पुरवठा ठप्प झाल्यानंतर सरकारने हे पाऊल उचलले आहे. गॅसच्या तुटवड्यामुळे दिल्ली, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडसह अनेक राज्यांनी व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर सध्या बंदी घातली आहे. या बंदीमुळे रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्स बंद होण्याची वेळ आली आहे. लहान हॉटेल्स आणि भोजनालये चालवणाऱ्यांनी सरकारला पुरवठा पूर्ववत करण्याची मागणी केली आहे.

पहिली श्रेणी (पूर्ण पुरवठा): यात तुमच्या घरातील स्वयंपाकाचा गॅस (PNG) आणि वाहनांमध्ये वापरली जाणारी CNG येते. यांना पूर्वीप्रमाणे पूर्ण गॅस मिळत राहील.

दुसरी श्रेणी (खत कारखाने): खत बनवणाऱ्या कारखान्यांना सुमारे 70% गॅस दिला जाईल. फक्त त्यांना हे सिद्ध करावे लागेल की गॅसचा वापर खत बनवण्यासाठीच झाला आहे. तिसरी श्रेणी (मोठे उद्योग): नॅशनल ग्रिडशी जोडलेल्या चहाच्या कारखान्यांना आणि इतर मोठ्या उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार सुमारे 80% गॅस मिळेल.

चौथी श्रेणी (छोटे व्यवसाय आणि हॉटेल्स): शहरांच्या गॅस नेटवर्कशी जोडलेल्या छोट्या कारखान्यांना, हॉटेल्सना आणि रेस्टॉरंटना त्यांच्या जुन्या वापराच्या हिशोबाने सुमारे 80% गॅस दिला जाईल. अत्यावश्यक वस्तू कायदा 1955 हा असा एक कायदा आहे, जो सरकारला ही शक्ती देतो की ते कोणत्याही आवश्यक वस्तूंचा, जसे की - धान्य, डाळी, खाद्यतेल, औषधे किंवा इंधनाचा पुरवठा आणि किमती नियंत्रित करू शकतील. याला सोप्या भाषेत 'साठेबाजी रोखणारा कायदा' म्हणू शकतो. जेव्हा कधी एखाद्या वस्तूची कमतरता भासू लागते किंवा तिच्या किमती खूप वाढू लागतात, तेव्हा सरकार हा कायदा लागू करते. या अंतर्गत व्यापाऱ्यांसाठी साठ्याची एक मर्यादा निश्चित केली जाते की ते एका मर्यादेपेक्षा जास्त माल गोदामांमध्ये साठवू शकत नाहीत.

## संभाजीनगरात कारखाने बंद होण्याच्या मार्गावर

मुंबई (दै. संध्या)

- गॅसचा मुंबईसह ठाणे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, अकोल्यातल्या हॉटेलांना फटका



मध्यपूर्वेतील अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचे परिणाम आता महाराष्ट्रात स्पष्टपणे दिसू लागले आहेत. या युद्धामुळे गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून एलपीजी आणि एलएनजी गॅसचा तुटवडा निर्माण होऊ लागला आहे. या परिस्थितीचा परिणाम उद्योग, हॉटेल व्यवसाय आणि सामान्य नागरिकांवर एकाच वेळी होताना दिसत आहे. काही ठिकाणी उद्योग बंद होण्याच्या मार्गावर आहेत, तर शहरांमध्ये गॅस सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यामुळे राज्यात गॅस टंचाईचे संकट अधिक गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये एलएनजी गॅसच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका उद्योगांना बसताना दिसत आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये सुमारे 30 कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची माहिती समोर येत आहे. विशेषतः ऑटोमोबाईल, फार्मा आणि स्टील उद्योगावर या तुटवड्याचा मोठा परिणाम झाला आहे. सध्या अनेक उद्योगांकडे केवळ दोन दिवस पुरेल एवढाच गॅस साठा उरला आहे. केंद्र सरकारने या वायूचा वापर केवळ घरगुती एलपीजी उत्पादनासाठी राखीव ठेवल्याने औद्योगिक गॅस पुरवठा थांबला आहे. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेवर थेट परिणाम झाला असून अनेक कारखान्यांना कामकाज कमी करावे लागले आहे.

संभाजीनगरमधील शेंद्रा, वाळूज आणि चिखलठाणा या औद्योगिक भागांमध्ये गॅस तुटवड्याची परिस्थिती अधिक तीव्र झाली आहे. औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) क्षेत्रात दररोज सुमारे 250 ते 300 मेट्रिक टन एलएनजीची गरज असते. मात्र सध्याच्या परिस्थितीत हा पुरवठा विस्कळीत झाला आहे. कतारमधून येणाऱ्या द्रवीकृत नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने काही मोठ्या उद्योगांचे उत्पादन आधीच थांबले आहे. या परिस्थितीत आणखी उद्योग बंद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, गॅस टंचाईचा परिणाम आता मुंबईतील हॉटेल उद्योगावरही दिसू लागला आहे. आहार म्हणजेच असोसिएशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट या संघटनेच्या माहितीनुसार गॅसच्या कमतरतेमुळे शहरातील जवळपास 20 टक्के हॉटेल्स बंद ठेवण्यात आली आहेत. हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणावर एलपीजी आणि कमर्शियल गॅसवर अवलंबून असल्याने हा तुटवडा गंभीर मानला जात आहे. सध्या अनेक हॉटेल्सकडे फक्त आज आणि उद्या पुरेल एवढाच गॅस साठा उरला आहे. पुढील तीन दिवसांत पुरवठा सुरळीत झाला नाही, तर मुंबईतील सुमारे 50 टक्के हॉटेल्स बंद करण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## स्वच्छ व नियमित पाणीपुरवठ्यासाठी तातडीने कार्यवाही करा : आदिती तटकरे

मुंबई (दै. संध्या)



श्रीवर्धन नगरपालिकाहद्दीतील नागरिकांना स्वच्छ व नियमित पाणी पुरवठा व्हावा, यासाठी तातडीने कार्यवाही करावी. रानवली धरणातून पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आखाव्यात, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. श्रीवर्धन नगरपालिका हद्दीतील विविध पायाभूत सुविधांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा नगरप्रशासन अधिकारी विराज लबडे, उपनगराध्यक्ष अनंत गुरव, मुख्याधिकारी राठोड तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते. मंत्री तटकरे म्हणाल्या की, नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेली पाणीपुरवठ्याची समस्या तातडीने सोडविणे आवश्यक आहे. त्यासाठी रानवली धरणातून आराठी, धोंड गल्ली आणि जीवना बंदर परिसरातील साठवण टाक्यांमध्ये पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था करावी, यामुळे नागरिकांना स्वच्छ व नियमित पाणी मिळण्यास मदत होईल आणि पाण्याचे समान वितरणही शक्य होईल. पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती मिळावी यासाठी स्थानिक स्तरावर पाणी वितरणाचे वेळापत्रक जाहीर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## पुणे पोर्शे अपघात प्रकरण : विशाल अग्रवालांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

### येरवडा कारागृहातून होणार सुटका

पुणे (दै. संध्या)



पुण्यातील कल्याणीनगर पोर्शे कार अपघात प्रकरणात एक मोठी कायदेशीर घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि अपघातावेळी कार चालवणाऱ्या अल्पवयीन मुलाचे वडील, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला आहे. गेल्या 20 महिन्यांहून अधिक काळ येरवडा केंद्रीय कारागृहात न्यायालयीन कोठडीत असलेल्या अग्रवाल यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वीच रक्ताचे नमुने बदलल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेले आदित्य सूद, आशिष मित्तल आणि अमर गायकवाड यांनाही सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिला होता. 19 मे 2024 रोजी घडलेल्या एका भीषण अपघातापासून हे प्रकरण सुरू झाले. कल्याणीनगर भागात एका बड्या बापाच्या अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने पोर्श कार चालवत एका दुचाकीला जोरदार धडक दिली होती. या अपघातात आयटी क्षेत्रातील दोन तरुण अभियंत्यांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेने केवळ पुणेच नव्हे तर संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळली होती. अपघातानंतर आपल्या मुलाला वाचवण्यासाठी विशाल अग्रवाल यांनी ससून रुग्णालयातील डॉक्टरांच्या मदतीने रक्ताचे नमुने बदलल्याचा आणि पुरावे नष्ट करण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप पोलिसांनी केला होता. या प्रकरणी पुणे पोलिसांनी 21 मे 2024 अग्रवाल यांना छत्रपती संभाजीनगरमधून अटक केली होती. या प्रकरणातील तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या. ससून रुग्णालयातील तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अजय तावरे यांनी रक्ताचे नमुने बदलण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, त्यांनाही न्यायालयाने यापूर्वीच जामीन मंजूर केला आहे. दुसरीकडे, या प्रकरणाच्या तपासात सुरुवातीला हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत पुणे पोलिस दलाने कठोर पावले उचलली आहेत. या प्रकरणी निलंबित करण्यात आलेल्या दोन पोलिस अधिकाऱ्यांना तीन महिन्यांपूर्वीच सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. ज्या अल्पवयीन मुलाने हा अपघात घडवला, त्याचीही सुधारगृहातून सुटका झाली असून त्याची आईदेखील सध्या जामिनावर बाहेर आहे. विशाल अग्रवाल यांच्या जामिनामुळे आता या प्रकरणातील जवळपास सर्वच मुख्य आरोपी कारागृहाबाहेर आले आहेत. विशाल अग्रवाल हे पुण्यातील नामांकित 'ब्रम्हा कॉर्प' या बांधकाम समूहाचे प्रमुख असून, त्यांच्यावर पुराव्यांशी छेडछाड करणे आणि अल्पवयीन मुलाला मद्यप्राशनास प्रोत्साहन देण्यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता या खटल्याला नवीन वळण मिळण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

# गावच्या गल्लीतली पोरं परवापरवापर्यंत होती, ती गेली कुठे?



गावाला प्राचीनत्वाचा स्पर्श देणाऱ्या काही खास गोष्टी असतात. उदाहरणार्थ, सांजेचा प्रहर. 'झाल्या तिन्ही सांजा.. करून शिणगार साजा..' या गाण्यात येतो तो तिन्हीसांजेचा प्रहर. दिवसभर सुन्नाट उन्हातल्या स्तब्ध शांततेमध्ये निपचित पडल्यासारखं वाटणारं गाव 'सांच्यापार'च्या प्रहरी प्राण धारण करायला लागतं. दिवसभर शाळेच्या कोंडवाड्यात अडकून सुटलेली पोरं गावातल्या गल्ल्यांमधून, बारक्या बारक्या वाटांवरून दिसायला लागतात. रानामाळातून कष्टून गावात परत येणारी माणसं-बायामाणसं दिसायला लागतात. पाण्याच्या आडा-हापश्यांवर वर्दळ वाढते. पूर्वी 'आकाशवाणी' बोलत असायची, आता टीव्हीवरल्या बातम्यांच्या सिग्नेचर ट्यून्स किंवा मालिकांची शीर्षकगीतं विरळ-सघन स्वरात वाऱ्यावर भिरभिरायला लागतात. जराभर उशिराने गावातल्या रस्त्यांवरच्या लायटींचे खांब पेटतात, तेव्हा त्यातून प्रकटणारा मळकट धूसर आणि पिवळसर उजेड. मधल्यामधल्या घरांतून रस्त्यावर ओसंडत असलेले उजेडाचे तुकडे. गल्लीत काहीबाही खेळणारी बारकी पोरं, त्यांचे कल्लोळ आणि घराघरांतून दरवळणारे स्वैपाकातले चटकदार गंध. मधूनच मशिदीतून अजान-नमाजीचे स्वर उठतात. देवळातल्या घंटेचे निनाद ऐकायला येतात. कुठे भजनाचे सूर. उशीरभराने देवळात पोथी चालू होते. याच्या त्याच्या ओट्यावर तरणी पोरं चावटसावट गप्पांमध्ये रंगून जातात. उशिरा एखादा चुकार 'देशीवादी' आरोळ्या ठोकत हेलपाटत शेजाऱ्याला किंवा बांधभावाला गाळ्या देत इकडून तिकडे जाताना दिसतो. अगदी शेवटपर्यंत गल्लीगल्लीतून कुत्र्यांच्या भांडणांचे आवाज उठत राहतात. हळूहळू गाव पुन्हा सकाळपर्यंत गुडूप झोपी जातं. अगदी शेवटून उरतात ते गर्द काळोख्या शांततेचे आवाज. ...हे असं चित्र परवापर्यंत होतं आणि क्वचित आजही दिसतं गावांमधून. संध्याकाळी, आणि पुढे रात्र चढत जाईल तसतशी, गावं त्यांच्या मूळ प्राचीन रूपात जात राहतात. प्राचीन म्हणजे फारच प्राचीन. गावाचे बाहेरचे रंग बरेचसे बदलले असले तरी गावाचं अंतरंग अजूनही जाणवतं, ते रात्री उशिरा. संध्याकाळी कधी गावाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत उगाचच चालत गेलं, तर काही गोष्टी बदललेल्या दिसतात अर्थात. म्हणजे माझ्या लहानपणी दिसायची तेवढी बारकी पोरं आता रस्त्यात खेळताना दिसत नाहीत. तरण्या पोरांच्या बसायच्या काही ठराविक जागा होत्या, त्या रिकाम्या दिसतात आता. कुठे एखाद्या घराच्या ऐसपैस ओट्यावर, कुठे बाजाराच्या मैदानात, शाळेच्या ग्राउंडवर, वेशीशी असलेल्या दुकानांच्या उतरत्या पायऱ्यांवर जागजागी मोठी पोरं गप्पांचे अड्डे जमवून असत. कुठे भांडणं होत. कुठे नुसत्याच 'चर्चा' घडत. ही पोरं आता तशी दिसत नाहीत. मागच्या बारा-पंधरा वर्षांत मोबाइल नावाच्या मूठभर यंत्राने खूप गोष्टींना मूठमाती दिली. त्यात ही इथे तिथे बसून गप्पा मारणारी किंवा रात्री उशिरापर्यंत शाळेच्या मैदानात व्हॉलीबॉल खेळणारी पोरं नाहीशी झाली. 'लपनापाणी' किंवा विटीदांडू वगैरे खेळत असलेली बारकी पोरंही मोबाइलने गावांच्या रम्य चित्रातून पुसून टाकली. एखाद्या ओट्यावर चार पोरं बसलेली असली तर चारही जणांच्या मुंड्या मोबाइलमध्ये खुपसलेल्या असतात. हजार वर्षांपासून एकसारख्या असणाऱ्या रात्री मागच्या एकदीड दशकात कुणास ठाऊक कुठे हद्दपार झाल्या आहेत. गावांना प्राचीनत्व बहाल करणारे ते लक्षणसंपन्न स्वप्नासारखे सांजप्रहर विरून गेल्याचं लक्षात येतं, तेव्हा मला बराच वेळ वाईट वाटत राहतं.

## संस्कृत सुभाषित

अप्युन्मत्तात्प्रलपतो बालाच्च परिजल्पत:
सर्वत: सारमादद्यादश्मभ्य इव कांचनम ॥
(उद्योगपर्व, अध्याय ३४, ३२, महाभारत)

अर्थ – वेडाच्या लहरीत बरळणाऱ्या वेड्यापासून, बोबडे बोल बोलणाऱ्या बालकापासून, सर्वांपासून, दगडांतून सोने निवडावे त्याप्रमाणे चांगले तेवढे ग्रहण करावे.

## गुरु वचन

### देश आणि काळाचे ज्ञान

देश आणि काळाच्या संबंधात जे आपले ज्ञान आहे. ते खूपच मर्यादित आणि थोडे आहे. आपण देशाच्या खोलवर जात नाही त्याचे मूळ समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. वेळ किंवा काळ काय आहे. त्याचे मूळ स्वरुप काय आहे. याला खरोखरच मनात उतरवल्याने देश आणि काळाचे आपले अपूर्ण ज्ञान काही अंशी पूर्ण होऊ शकते आणि आपले विचार सीमित देश आणि परिमित काळाच्या मागे जाऊ शकतात. विचार करण्याची गोष्ट ही आहे की, आपण युग, वर्ष, महिना, दिवस आदींना काळ समजतो तो काळ हा प्रकृतीपासून निर्मित आहे. आणि प्रकृतीच्या गर्भात आहे. परंतु महाप्रलयाच्या वेळी जेव्हा हे कार्यरुप संपूर्ण जगात आपल्या कार्यरुप प्रकृतीमध्ये मिळून जाते. त्यावेळी देश–काळाचे रुप काय असते. ते देशकाळ प्रकृतीचे कार्य असते. त्यामुळे या प्रश्नावर विचार केला तर असे वाटते की, अशक्त देश काळ ज्या अशक्त देश काह ज्या प्रकृतीरुप देश काळात मिळून जातात. प्रकृती रुप देश काळतर प्रकृतीचे स्वरुप आहे. आणि या प्रकृतीचे जे अधिष्ठान आहे. अर्थात ही प्रकृती आपले कार्य संपूर्ण जड दृश्यवर्ग मिळाल्यानंतरच ज्यामध्ये ही स्थिती असते. ते अधिष्ठान प्रकृतीचे कार्य असू शकत नाही. ते तर सर्वांचे पहिले कारण आहे आणि सर्वाचे पहिले कारण एकमात्र विज्ञानान्धन परमात्मा हेच आहे. त्या विज्ञानन्दन ती साम्यावस्थामध्ये राहते आणि कधी विकासाला प्राप्त होते. ज्यावेळी ती साम्यावस्थमध्ये त्यावेळी आपले कार्य समस्त जड दृश्यवर्गाला आपल्यात लीन करुन परमात्माच्या कोणत्याही एक अंशी स्थिती असते. आणि ज्यावेळी तोच परमात्माला सकारात्मकतेमुळे विषमता प्राप्त होते. त्यावेळी परमात्म्याची देखरेख संसाराचे सृजनत्व असते.

## उपदेशकथा

### स्वार्थ

राजा वीरेंद्रसिंह एकदा शिकारीला निघाले होते. शिकार आणि घोडदौड हे त्यांच्या आवडीचे विषय होते. नेहमीप्रमाणे लवाजमा घेऊन वीरेंद्रसिंह जंगलच्या रस्त्याला लागले. गाव मागे पडले अन् जंगलाचा रस्ता सुरू झाला. राजाने पाहिलं तर समोर एक वृद्ध गृहस्थ कसले तरी रोप लावत होता. राजाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, 'म्हातारबा, कसले रोप लावताहात?' म्हातारा म्हणाला, 'राजा, आरं मी बदामाचं झाड लावतोया.' राजा म्हणाला, 'ते खरं म्हातारबा, पण त्याचा तुम्हाला काय उपयोग? हे झाड वाढणार कधी अन् त्याला बदाम लागणार कधी? कदाचित तुम्ही तेव्हा असणारही नाही. कशाला एवढे कष्ट घेत आहात?' म्हातारा शांतपणे म्हणाला, ''ते मला कळतंया रं ! पण स्वत:च्या पोटापुरतं पाहणारा मनुष्य नीच असतो. मला फळं मिळाली नाहीत तर काय झालं? कुणाला तरी मिळतीलच ना !''

कथा उपदेश : स्वार्थी माणूस स्वत:चाच विचार करतो.

## पंचांग



पंचांग
११ मार्च २०२६
बुधवार
विक्रम संवत्– २०८२
फाल्गुन शके
संवत्– १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– फाल्गुन
ऋतु– सौर वसंत
कृष्ण पक्ष
तिथि:अष्टमी
२८:१९:४३+
नक्षत्र:ज्येष्ठा २१:५९:५८
योग:वज्र ०९:११:३४
करण:बालव १५:०८:१६
करण:कौलव
२८:१९:४३+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:धनु२१:५९:५८
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – रमजान
तारीख – २१
विशेष
कलाष्टमी
वषीतपारंभ
(जैन
शहादते हजरत अली)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | 3 | | | | |
| 9 | 7 | | 2 | 8 | | | | 1 |
| 1 | 3 | | | 5 | | 4 | | |
| 3 | | | 8 | 4 | | 7 | | |
| 7 | 4 | 1 | | | | 8 | 3 | 5 |
| | | 2 | | 7 | 1 | | | 6 |
| | | 4 | | 6 | | | 5 | 8 |
| 8 | | | | 2 | 9 | | 7 | 4 |
| | | | | 1 | | | 9 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८८२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 6 | 8 | 3 | 7 | 4 | 9 | 1 |
| 1 | 3 | 4 | 6 | 9 | 2 | 8 | 7 | 5 |
| 8 | 9 | 7 | 4 | 1 | 5 | 3 | 2 | 6 |
| 4 | 2 | 1 | 7 | 5 | 3 | 9 | 6 | 8 |
| 5 | 6 | 3 | 9 | 8 | 1 | 2 | 4 | 7 |
| 7 | 8 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 1 | 3 |
| 9 | 7 | 5 | 3 | 2 | 6 | 1 | 8 | 4 |
| 6 | 1 | 8 | 5 | 4 | 9 | 7 | 3 | 2 |
| 3 | 4 | 2 | 1 | 7 | 8 | 6 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१८ – रशियाने राष्ट्रीय राजधानी पेट्रोगॉर्डच्या जागी मॉस्कोला राजधानी बनविले.
- १९६६ – जपानच्या नुमाता येथे दोन स्की रेसोर्टमध्ये लागेल्या आगीत ३१ जण ठार झाले.
- २००४ – स्पेनमध्ये मॅड्रीड येथे रेल्वेत एकापाठोपाठ झालेल्या स्फोटात १९२ जण ठार झाले.
- २००५ – मिचेल बेचलेट यांची चिलीच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- २००७ – चीनच्या उत्तर पूर्वे तील लाओनिंग प्रांतातील कोळशाच्या एका खाणीत आलेल्या पुराने २० लोक ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९९९ – इन्फोसीसचा नसदक स्टॉक एक्सचेंगमध्ये समावेश करण्यात आला, यात सामील होणारी तो पहिली भारतीय कंपनी ठरली.

### जन्म

- १९१५ : विजय हजारे, क्रिकेटपटू
- १९१६ – हरोल्ड विल्सन, युनायटेड किंगडमचे पंतप्रधान.
- १९५८ – गाजी मशाल अजल अल यावर, इराकचे राष्ट्राध्यक्ष.

### निधन

- ०२२२ – इलगाबलस, रोमन राजा.
- १९५५ – अॅलेक्झेंडर फ्लेमिंग, स्कॉटीश शास्त्रज्ञ.
- १९९० – डिन होरीक्स, इंग्लीश फुटबॉलपटू.
- २००६ – स्लोबोदन मिलोसेवीक, सर्बिया आणि युगोसलाव्हियाचे राष्ट्राध्यक्ष.
- २००८ – गस गिओरदानो, जाज नृत्याला लोकप्रियता देणारे कोरियोग्राफर.
- २००८ – जगन्नाथ गोपाल उर्फ ज.गो.कुलकर्णी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते व पंचगंगा बँकेचे संस्थापक.

## : SMS :

Sardar on phone: Doctor my wife is pregnant. She is having pain right now.
Doctor: Is this her first child?
Sardar: No this is her husband speaking !!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.८ | २१.७ |
| अहमदनगर | ३३.१ | २२.१ |
| अकोला | ३६.३ | २३.५ |
| अमरावती | ३५.६ | २३.१ |
| बीड | ३७.३ | २२ |
| भंडारा | ३६ | २०.८ |
| बुलढाणा | ३४.४ | १७.४ |
| चंद्रपूर | ३७.३ | २२ |
| चेन्नई | ३३.६ | २२.१ |
| नवी दिल्ली | ३४.८ | १९.७ |
| धुळे | ३४.८ | २३.५ |
| गोंदिया | ३४.७ | २०.१ |
| जळगाव | ३७.६ | २२.८ |
| कोल्हापूर | ३३.९ | २०.८ |
| लातूर | ३३.५ | २१.३ |
| मुंबई | ३७.७ | २८ |
| नागपूर | ३५.४ | २१.३ |
| नांदेड | ३५.४ | २२.५ |
| नंदूरबार | ३३.६ | २४.४ |
| नाशिक | ३४.१ | २२ |
| पुणे | ३३ | २१.४ |
| पंढरपूर | ३४.४ | २२.४ |
| सातारा | ३४.३ | १९.८ |
| सांगली | ३४.७ | २१.२ |
| सोलापूर | ३४.८ | २४ |
| वर्धा | ३६.४ | २२.७ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर यश मिळाल्याने उत्साह वाढेल. श्रेष्ठ लोकांच्या भेटी होतील.

**तुळ :** तुळ : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर तणावमुक्त झाल्यामुळे प्रसन्न वातावरण राहील. कार्याचा विस्तार वाढेल.

**वृषभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम आर्थिक फायदा मिळण्याचे योग आहेत. प्रयत्न केल्यानंतर अडचणी दूर होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पूर्व व्यक्तिगत कामात प्रगती होईल. संत लोकांचा सहवास मिळेल. आपल्या चांगल्या संबंधामुळे फायदा होईल.

**मिथुन :** मिथुन : शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा: उत्तर व्यापाराच्या विस्तारासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल. विरोधकांपासून सावधानी बाळगा.

**कर्क :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम नवीन संबंध प्रस्तापित होतील. आपला प्रभाव वाढल्याने विरोधक त्रस्त होतील.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल. विरोधकांपासून सावधानी बाळगा.


**सिंह :** शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा: दक्षिण विरोधकांची हालचाली वाढतील. आर्थिक तणावामुळे कुटुंबात वाद होण्याची शक्यता.

**कुंभ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण कौटुंबिक वातावरण उत्साहपूर्वक राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक योग चांगले आहेत.

**कन्या :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण मितभाषी राहिल्यामुळे आपणास अडचणींचा सामना करावा लागेल.

**मीन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण अगोदर केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसण्यास सुरूवात होईल. बुद्धीमत्तेवर अडचणींवर मात कराल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८३



### आडवे शब्द

१. भारताचे माजी रेल्वेमंत्री
७. अकस्मात
९. दोन मैलांचे अंतर
११. प्रत्येक, शंकर
१२. प्रत्येक वर्षी
१४. पळून जाणे
१५. मोठे शहर, गाव
१६. कविता लिहणारा
१७. हट्टी
२०. फोडमधील द्रव
२१. रंग
२२. वारा, हवा
२३. कायदेशीर
२६. लाजीरवाणे
२७. हिचा 'एकच प्याला' अनेक कुटुंबांची वाहताहत करणारा
२९. फोल, व्यर्थ
३०. कारस्थानी
३२. बेचव
३४. 'बहिरी' शिकारी पक्षी
३६. मृत्यू नसलेला
३७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
३८. नमस्काराचा एक शब्द
४१. पाप
४३. कोणत्याही गोष्टीतील 'अर्थ' (ला.)
४४. बैठक
४५. प्रमाणपत्र
४६. छातीत होणारी आग
४७. मऊ
४८. खोकला
५१. श्रावणी शेंगभाजी
५१अ. अफवा, वावडी
५२अ. 'एअर इंडिया'चे बोधचिन्ह
५३. तारणहार
५४. परिचय
५६. क्रिकेटमधील शून्य (इंग्रजी)
५७. बाजू, पक्ष
५८. गावगप्पांचे ठिकाण
६०. पगार
६२. ओरखडा
६४. छोटे चर्मवाद्य
६६. कशा प्रकारचा
७०. मौज, गंमत
७०अ. दोन वेळा म्हटल्यास एक देशी खेळ
७१. एक द्विदल धान्य
७२. शर्करा
७३. बातमी (हिंदी)
७४. पावलाचा खालचा भाग
७६. लहान मूल
७८. केवड्याचे रान
७९. धुणे
८०. आवरणातील छोटासा तुकडा
८१. यथेच्छ

### उभे शब्द

१. संगोपन
२. तीन तास
३. तात्पर्य
४. आपसातील युद्ध
५. किंमत
६. वस्ती
८. चहा पिण्याचे जोडसाधन
९. कोकिळ (हिंदी)
१०. खळबळजनक
११. केसांची बट
१६. कान
१८. गंध
१९. केविलवाणा
२१. जेवणापूर्वी म्हणण्याचा श्लोक– '––– नाम घ्या श्रीहरीचे'
२२. घोडा
२४. करुणा, कीव
२५. दागदागिने
२७. सेवक
२८. विजयादशमी
३१. पुन्हा
३३. फळातील द्रव
३५. चाणक्यनिती
३७. पंकज
३८. ढीग
३९. चिंतन
४०. कलावंत
४२. सत्व
४३. राजनीतीशी संबंधित
४४. बोंबाबोंब, हाकाटी
४९. समानता
५०. पटाईत, निष्णात
५२. कढी, मठ्ठा, लस्सी असे याचे कितीतरी प्रकार!
५५. जखमेवरचा पापुद्रा
५९. आश्चर्य
६१. नजरेचा पहारा
६३. श्रीरामाचे स्तोत्रकवच
६५. न्याहारी
६७. कणीदार
६८. कौशल्य
६९. वस्तू, माल
७४. शरीर
७५. रस्ता, मार्ग
७६. कठीण प्रसंग
७७. विडा

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.निराधार ४.मुद्दाम ६.विकसनशील १०.रस ११.मटका १२.जवळ १३.लक्षण १४.मजा १५.दलाल १६.खारट १८.रक्तदान १९.दमा २१.सा.न.वि.वि. २४.परळी वैजनाथ २८.शक ३०.रमताराम ३१.साधना ३३.हालहवाल ३५.भजन ३७.पळवाट ३९.रन ४०.वलय ४१.बाजू ४२.हाव ४४.गीताई ४६.नवार ४८.तराजू ५०.नरम ५२.बरबाद ५३.अंगाई ५५.मासलेवाईक ५८.लालसर ५९.वासा ६१.करामत ६३.पापा ६५.तन ६६.खसखस पिकणे ६८.पाचर ६९.वाम ७१.यार ७२.रमल ७३.रग ७५.नवरदेव ७८.जवळचा ८१.भानगड ८२.परिवर्तन

उभे उत्तर : १.निरक्षर २.रास ३.रमजान ४.मुकादम ५.मजल दरमजल ६.विळखा ७.सपाट ८.शीलवान ९.लक्ष १४.मदारी १७.रमूज २०.मळी २१.साथ २३.विविध २३.कोमल २४.पराभव २५.वैरी २७.नारळ २८.शहाजहान २९.कल ३०.रवानगी ३१.साट ३२.नायक ३४.हर ३६.नयनबाग ३७.पगार ३८.वाजतगाजत ४१.बाजू ४३.वरमाला ४५.तालेवार ४७.वाद ४९.रावा ५१.मसलत ५२.बकवास ५४.तडीपार ५६.लेसन ५७.खुराक ६०.साखरझोप ६१.कपिलदेव ६२.मणेर ६३.पाचकळ ६४.हेवा ६६.खरवस ६७.सम ७०.मनन ७१.यादे ७४.गज ७६.वग ७७.रड ७९.वर्ण ८०.चावी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### समतानगर पुनर्विकास प्रकल्प एप्रिलपासून पुन्हा सुरु होणार : मंत्री शंभूराज देसाई

पुणे (दैनिक संध्या) : समतानगर कांदिवली (पूर्व) येथील मध्यम उत्पन्न गटाच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम १ एप्रिल २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. या कामाच्या प्रगतीचा दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाईल. या कामात विलंब झाल्यास विकासकावर कारवाई करण्यात येईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य श्रीकांत भारतीय यांनी विधान परिषदेत या विषयी प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भाई जगताप, प्रवीण दरेकर, अनिल परब यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, समतानगर येथील प्रकल्पासंदर्भात राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या प्रकल्पातील ३१८ निष्कासित सदनिकाधारकांपैकी ३१० जणांचे भाडे मार्च २०२६ पर्यंत देण्यात आले असून उर्वरित आठ जणांचे भाडे देण्याचे आदेशही देण्यात येतील. तसेच दरवर्षीचे भाडे आगावू देण्याबाबत सूचित केले जाईल. तसेच भाडेकरूंना देय असलेल्या भाड्याबाबत कोणतीही तक्रार राहू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असेही मंत्री देसाई यांनी सांगितले. अधिवेशन संपल्यानंतर सर्व संबंधितांची या विषयी पुन्हा बैठक घेतली जाईल. या बैठकीस लोकप्रतिनिधी, म्हाडा अधिकारी तसेच गृहनिर्माण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, भाडेकरूंचे प्रतिनिधी यांनाही निमंत्रित केले जाईल असेही मंत्री देसाई यांनी सांगितले.

### अन्य राज्ये व केंद्र शासनाच्या प्रक्रियेचा समितीमार्फत अभ्यास करून निर्णय घेणार

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील परीक्षार्थींना एकाच पदासाठी वेगवेगळ्या विभागांच्या वेगवेगळ्या परीक्षा देण्याची गरज भासू नये, यासाठी परीक्षांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे परीक्षार्थींना वेगवेगळे परीक्षा शुल्क भरण्याची गरज भासणार नाही. तसेच अन्य राज्यातील तसेच केंद्र शासनाच्या परीक्षांमध्ये राखीव प्रवर्गातील परीक्षार्थींकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काचा समितीमार्फत अभ्यास करून शुल्क सवलतीसंदर्भात योग्य निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितले. शासकीय नोकर भरती प्रक्रियेमध्ये आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्कासंदर्भात सदस्य श्वेता महाले यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावर मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी उत्तर दिले. सदस्य सुधीर मुनगंटीवार, नितीन राऊत, राजेश पवार, राजकुमार बडोले, प्रताप अडसड आदींनी या चर्चेत सहभाग घेतला. मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाने आतापर्यंत 'महाभरती'च्या माध्यमातून सुमारे १ लाख २० हजार पदांची भरती केली असून चालू अर्थसंकल्पात आणखी ७० हजारांहून अधिक पदांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या विविध विभागांतील भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. भरती प्रक्रियेत परीक्षा सुसूत्रीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी समान पदासाठी वेगवेगळ्या विभागांकडून स्वतंत्र परीक्षा घेतल्या जात असल्याने उमेदवारांना अनेक वेळा परीक्षा देऊन प्रत्येक वेळी शुल्क भरावे लागत होते. आता एकाच पदासाठी विविध विभागांच्या परीक्षांचे सुसूत्रीकरण करण्यात येत असल्याने उमेदवारांना वारंवार परीक्षा देण्याची गरज भासणार नाही, असे त्यांनी सांगितले.

### वैद्यकीय महाविद्यालयाचा लवकरच प्रस्ताव पाठविण्यात येणार : प्रकाश आबिटकर

पुणे (दैनिक संध्या) : नागपूर येथील कामगारांसाठी प्रस्तावित असलेल्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ESIC) वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावातील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. राज्य शासनामार्फत याबाबत उचलत असल्याची ग्वाही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. नागपूरच्या कामगार रुग्णालयात पडून असलेल्या ५० वैद्यकीय उपकरणांच्या (मशिन्स) प्रकरणाची आज चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेशही श्री आबिटकर यांनी दिले. प्रश्नोत्तराच्या तासात आमदार प्रवीण दटके यांनी नागपूरच्या इएसआयसी मेडिकल कॉलेजचा प्रश्न उपस्थित केला होता. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, नागपुरात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासन पूर्ण सकारात्मक आहे. २०२० मध्ये राज्य कामगार विमा योजनेत जे बदल झाले, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन, डेप्युटेशन आणि निवृत्ती वेतन याबाबत काही कायदेशीर व तांत्रिक गुंते निर्माण झाले होते. या तांत्रिक बाबींमध्ये दुरुस्ती करून नवीन सामंजस्य करार (MoU) करण्यासाठी विनंती केली आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच तत्काळ संमती दिली जाईल. नागपूरच्या रुग्णालयात यंत्रसामुग्री धूळ खात पडून असल्याच्या मुद्द्यावर मंत्र्यांनी गंभीर दखल घेतली. शासकीय निधीतून घेतलेली यंत्रसामग्री जर वापरली जात नसेल, तर या प्रकरणाची आजच्या आज चौकशी लावली जाईल आणि जे अधिकारी किंवा कर्मचारी यात दोषी आढळतील, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. राज्यातील इएसआयसी रुग्णालयांच्या सद्यस्थितीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, नवीन डायलिसिस युनिट्स, एनआयसीयू (NICU) आणि अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर्स सुरू करण्यात येत आहेत. महात्मा फुले जीवनदायी योजना ही आता सर्व कामगार रुग्णालयांमध्ये ही योजना अनिवार्य करण्यात आली आहे, जेणेकरून केवळ कामगारांनाच नव्हे, तर सामान्य जनतेलाही या सुविधांचा लाभ मिळेल. या प्रश्नांच्या चर्चेत विधानसभा सदस्य विकास ठाकरे यांनी सहभाग घेतला.

---

### योगाभ्यानंद प.पू.माधवनाथ महाराज इंदौर यांचे साधने समयी आसन असलेले

# ९५ पेक्षा जास्त वर्षांपूर्वीचे व्याघ्रांबर व शाल पूजन

**कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट तर्फे आयोजन**

**पुणे (दै. संध्या) :**

बुधवार पेठेतील कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्ट तर्फे नाथषष्ठी निमित्त योगाभ्यानंद प.पू.माधवनाथ महाराज इंदौर यांचे साधने समयी आसन असलेले ९५ पेक्षा जास्त वर्षांपूर्वीचे व्याघ्रांबर व शाल यांचे पूजन मंदिरात झाले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई व कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई यांचे प.पू. माधवनाथ महाराज हे अध्यात्मिक गुरु होते. त्यामुळे याचे पूजन महाराजांच्या ९० व्या पुण्यतिथी दिनी मंदिरात करण्यात आले.

यावेळी दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.शिवराज कदम जहागिरदार, कार्यकारी विश्वस्त ॲड.रजनी उकरंडे, विश्वस्त राजेंद्र बलकवडे यांसह ट्रस्टचे माजी अध्यक्ष शिरीष मोहिते आदी उपस्थित होते.

ॲड.शिवराज कदम जहागिरदार म्हणाले, योगाभ्यानंद प.पू.माधवनाथ महाराजांची पुण्यतिथी म्हणजे समाधी दिन, हा दिवस नाथषष्ठीचा. प.पू. माधवनाथ महाराजांचा जन्म १८५७ रोजी चित्रकूट येथे झाला. त्यांची नित्य साधने म्हणजेच त्यांनी वापरलेले व्याघ्रासन व शाल रविवार पेठ येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिराचे पुजारी कै.रंगनाथ नारायण होशिंग-आलेगांवकर यांना दिले.



ते पुढे म्हणाले, हे साहित्य गेली ९५ वर्षे रविवार पेठेतील पुजारी कै.बाळकृष्ण आलेगांवकर, कै.विनायक आलेगांवकर यांनी जतन केले. त्यांच्या पत्नी कै. पद्मजा आलेगांवकर व मुलगी गौरी गुमास्ते, राहुल गुमास्ते, देवेश गुमास्ते यांनी हा अमुल्य ठेवा जोपासला असून दत्तमंदिरात दरवर्षी भाविकांना दर्शनासाठी आणले जाते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई व त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई यांचे माधवनाथ महाराज हे अध्यात्मिक गुरू होते. त्यांच्या प्रेरणेनेच पुण्यातील जगद्विख्यात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती व श्रीमती लक्ष्मीबाई यांनी श्री दत्त मंदिराची स्थापना केली.

---

### बेस्ट बससेवेबाबत मुंबईतील आमदारासमवेत बैठक घेणार - राज्यमंत्री माधुरी मिसाळ



**पुणे (दै. संध्या) :**

मुंबईतील बेस्ट बससेवाबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मुंबईतील सर्व स्थानिक आमदार यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल. या बैठकीस परिवहन विभागाचे अधिकारी यांनाही बोलवण्यात येईल असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य सुनील शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य प्रवीण दरेकर, सचिन अहिर यांनी उपप्रश्न उपस्थित केला. राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणल्या, मुंबईची लोकसंख्या आणि प्रवाशांची गरज लक्षात घेता शहरात किमान १० हजार बसची आवश्यकता आहे. यासाठी बेस्टने विविध कंत्राटदारांना ६,५५५ बस पुरवठ्यासाठी वर्क ऑर्डर दिल्या होत्या. मात्र कंत्राटदारांकडून बस वेळेत उपलब्ध होऊ न शकल्याने अपेक्षित प्रमाणात बससेवा वाढवता आली नाही. मार्च २०२३ पर्यंत १,३०० बस उपलब्ध होणे अपेक्षित होते, मात्र सध्या केवळ ६८५ बस उपलब्ध झाल्या आहेत. स्क्रॅपिंग पॉलिसीनुसार १५ वर्षांनंतर बस स्क्रॅप केल्या जात असल्याने बेस्टच्या मालकीच्या बसची संख्या कमी झाली आहे. पूर्वी बेस्टकडे १,८८२ मालकीच्या बस होत्या, मात्र सध्या ही संख्या २४९ इतकी राहिली आहे. उर्वरित बस भाडेतत्त्वावर घेतल्या असून सध्या २,५५८ भाडेतत्त्वावरील बस उपलब्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---

### भारतीय क्रिकेट संघात संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम या जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने 20 षटकांत 5 बाद 255 धावांचा विक्रमी डोंगर उभा केला. टी-20 विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील हा आजपर्यंतचा सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारतीय गोलंदाजांनी न्यूझीलंडचा डाव 159 धावांत गुंडाळत शानदार विजय मिळविला असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, फलंदाजांनी या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. फलंदाज संजू सॅमसन यांनी 46 चेंडूत 89 धावा करून संघाला मजबूत सुरुवात दिली. तसेच अभिषेक शर्मा यांनी अवघ्या 21 चेंडूत 52 धावा करत स्पर्धेतील सर्वात जलद अर्धशतकांपैकी एक नोंदविले. इशान किशन यांनी 25 चेंडूत 54 धावा करत धडाकेबाज फलंदाजी केली. तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनीही महत्त्वपूर्ण धावा जोडून संघाची धावसंख्या भक्कम केली. गोलंदाजीत जसप्रित बुमरा यांनी चार बळी घेत निर्णायक कामगिरी केली. संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक किफायतशीर गोलंदाज म्हणून त्यांनी संघाच्या विजयात मोठा वाटा उचलला. उपांत्य फेरीत त्यांच्या निर्णायक गोलंदाजीमुळे सामना भारताच्या बाजूने फिरल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच अक्षर पटेल यांनी तीन बळी घेत संघाला महत्त्वाची साथ दिली, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**पुणे (दै. संध्या) :**

आयसीसी मेन्स टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत संघाच्या कामगिरीचे कौतुक केले. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत एक अपवाद वगळता सर्व सामने जिंकत वर्चस्व गाजविले. संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ संघात पाहायला मिळाला. या कामगिरीबद्दल भारतीय संघाचे कर्णधार सूर्यकुमार यादव तसेच प्रशिक्षक गौतम गंभीर यासह सर्व संघाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव विधानसभा अध्यक्ष अँड. राहुल नार्वेकर यांनी संमत केल्याचे घोषित केले. विशेष अभिनंदन प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय क्रिकेटचा गौरवशाली इतिहास कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील संघाने 1983 मध्ये लॉर्ड्स येथे पहिला विश्वचषक जिंकल्यापासून सुरू झाला. त्यानंतर महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने 2007 मध्ये पहिला टी-20 विश्वचषक आणि 2011 मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकला. आता 2024 आणि 2026 मध्ये पुन्हा टी-20 विश्वचषक जिंकून भारताने क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे हे मुंबईचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुंबई आणि महाराष्ट्राने भारतीय क्रिकेटला अनेक महान खेळाडू दिले असून ग्रामीण आणि सामान्य कुटुंबांतील खेळाडू आज आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत, ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळ (बीसीसीआय) यांच्या कार्याचाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला. विधानसभेच्या वतीने भारतीय संघाला अभिनंदनाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कालच्या अंतिम सामन्यातील या विजयासह भारताने तिसऱ्यांदा टी-20 विश्वचषक जिंकत नवा इतिहास रचला असून तीन वेळा ही स्पर्धा जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. तसेच सलग दुसऱ्यांदा टी-20 विश्वचषक जिंकण्याची कामगिरीही भारताने प्रथमच केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

---

# *कायद्याबरोबरच समाजाच्या मानसिकतेतही बदल व्हायला हवा : अनुजा देशमाने यांचे मत*

### *जागतिक महिला दिनानिमित्त पद्मा फाउंडेशनतर्फे दुचाकी रॅली, महिलांचा सन्मान*

**पुणे (दै. संध्या) :**

"आजच्या काळात महिलांनी अनेक क्षेत्रांत आपली क्षमता सिद्ध केली आहे. महिलांना योग्य संधी, प्रोत्साहन आणि पाठबळ मिळाल्यास त्या समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. महिलांचे सक्षमीकरण हे केवळ महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे," असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले. जागतिक महिला दिनानिमित्त पद्मा फाउंडेशनच्या



वतीने दुचाकी रॅलीचे, तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. सिंहगड रस्त्यावरील मॉटेरोसा सोसायटी क्लब हाऊसमध्ये आयोजित सोहळ्याप्रसंगी प्रेरक वक्ते डॉ. दत्ता कोहिनकर, सहायक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, आयआरएस डॉ. संदीप साठे, उद्योजक तुषार गोसावी, सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई, डॉ. राजेंद्र खेडेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम, संयोजक व पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे, संचालिका पुष्पा कांबळे यांच्यासह मॉटेरोसा सोसायटीचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी फाउंडेशनच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

महिलांच्या सन्मानार्थ आयोजित दुचाकी रॅलीमध्ये विविध वेशभूषा करून महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रॅलीद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात शिक्षण, सामाजिक कार्य, उद्योग, आरोग्य, कला आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. पोलीस सेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल अनुजा देशमाने यांच्यासह माधुरी बर्वे व सुनीता डांगे (शिक्षण), वृषाली गोसावी (उद्योग व पर्यावरण), ऐश्वर्या थोरात (राजकारण), मनीषा खेडेकर (सामाजिक), ॲड. ऋतुजा चोरगे-साठे (वकिली), आर्या भागवत व आर्या पापळ (क्रीडा) यांना 'पद्मा सन्मान' पुरस्कार प्रदान करण्यात आला. इंटेरिअर डिझाइनर अमृता जाधव यांचा, तसेच ७५ वर्षांवरील महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

अनुजा देशमाने यांनीही महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन समाजाच्या प्रगतीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या कार्याची दखल घेतली जाते आणि इतर महिलांनाही प्रेरणा मिळते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केवळ कायदे आणि योजना पुरेशा नसून समाजातील मानसिकतेत बदल होणेही तितकेच आवश्यक आहे. महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येत स्वतःच्या हक्कांबरोबरच जबाबदाऱ्यांचीही जाणीव ठेवली पाहिजे, असे असेही त्यांनी नमूद केले. डॉ. दत्ता कोहिनकर यांनी महिलांच्या कार्याचे कौतुक करत प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. माधुरी बर्वे, ॲड. ऋतुजा चोरगे-साठे, ऐश्वर्या थोरात, मनीषा खेडेकर यांनीही मनोगते व्यक्त केली. फाउंडेशनचे सल्लागार जीवराज चोले यांनी प्रास्ताविक केले. शशिकांत कांबळे यांनी स्वागत केले. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. पुष्पा कांबळे यांनी आभार मानले.

---


# शंभूबलिदान दिन हा 'महामृत्युंजय रक्तदान दिन' म्हणून जाहीर करावा

### अमित गायकवाड यांची महाराष्ट्र सरकारला मागणी; शिवजयंती महोत्सव समिती, पुणे तर्फे राजव्यापी भव्य रक्तदान मानवंदनेचे आवाहन

**पुणे (दै. संध्या) :**

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन ११ मार्च हा दिवस 'महामृत्युंजय रक्दान दिन' म्हणून महाराष्ट्र सरकारने जाहीर करावा अणि त्यादविशी संपूर्ण महाराष्ट्रातून रक्तदान चळवळीतून संभाजी महाराजांना मानवंदना द्यावी, अशी मागणी शिवजयंती महोत्सव समिती, पुणेचे प्रवर्तक संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी केली आहे.

बुधवार, दि. ११ मार्च २०२६ रोजी शुभारंभ लॉन्स, म्हात्रे पूल डी पी रस्ता येथे सकाळी ९ ते ६ या वेळेत भव्य रक्तदान मानवंदनेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिवजन्मोत्यव स्वराज्यरथ सोहळ्यातील वीर स्वराज्यघराणी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे,




वारकरी संप्रदाय, क्रिडा संघटना, सहकार, शिक्षण संस्था, वाहतूक संस्था, ढोलताशा पथके उपहार गृह संघटना, सिने कलाकार संघटना यासह विवीध क्षेत्रातील नागरिक सहभागी होणार आहेत.

अमित गायकवाड म्हणाले, ज्या स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी रक्ताचा थेंबनथेंब अर्पण केला. स्वराज्याच रक्षण करण्यासाठी, भारतभूमीच रक्षण करण्यासाठी, भारताच्या गौरवशाली संस्कृतीच रक्षण करण्यासाठी त्या स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांना रक्तदानातून मानवंदना देऊयात, रक्ताच पांग रक्ताने फेडूया रक्ताचे रक्ताशी नाते जोडूयात, हि जाणीव जपत गेली ११ वर्षे आम्ही रक्तदान मानवंदना आयोजित करीत आहोत. त्यामुळे आमचा संकल्प नक्कीच पूर्ण होईल याच आम्हाला विश्वास आहे.

यावेळी सचिन पायगुडे, रवींद्र कंक, समीर जाधवराव, शंकर कडू, निलेश जेधे, मंगेश शिळीमकर, गोपी पवार, किरण देसाई, सागर पवार, प्रवीणभय्या गायकवाड, मोहन पासलकर, किरण शितोळे, तसेच गणेशोत्सव मंडळे, वारकरी संप्रदाय, क्रिडा, शिक्षण संस्था, सिने कलाकार, ढोलताशा पथके यासह विवीध क्षेत्रातील समन्वयक उपस्थित होते.

या रक्तदान मानवंदनेमध्ये शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळ्याच्या जिजाऊमॉसाहेब शहाजी महाराज शिवज्योत स्वराज्यरथाच्या नेतृत्वाखाली सहभागी सरसेनापती वीर बाजी पासलकर, सरदार कान्होजी नाईक जेधे, सरदार कृष्णाजी नाईक बांदल, सरनौबत सेनापती येसाजी कंक, नरवीर तानाजी मालुसरे, अटकवीर सरदार मानाजी पायगुडे, कान्होजी नाईक कोंडे, बाबाजी ढमढेरे, पिलाजीराव सणस, हैबतराव शिळीमकर, त्र्यंबकराव नाईक निंवगुणे, सरदार जैताजी नाईक करंजावणे, सरदार चांगोजी कडू, अढळराव बाबाजी डोहर धुमाळ, सुर्याजी काकडे, सरलष्कर सरसेनापती हंबीरराव मोहिते, सरसेनापती संताजी घोरपडे, सरदार गोदाजी जगताप, सरनोबत सिधोजी थोपटे, झुंजारराव मरळ, शितोळे सरकार, गोदाजी भुरूक, सरनोबत नागोजीराव कोकाटे, श्रीमंत माने सरकार घराणे, सरदार हिरोजी इंदलकर, श्रीमंत सरदार राऊतराव ढमाले, श्रीमंत सुभेदार खंडोजी माणकर, श्रीमंत सरदार दयाजीराव मारणे गंभीरराव, सप्तसहस्त्री सरदार नावजी बलकवडे, वीर माता धाराऊ गाडे, समुद्रस्वामी दर्यासारंग सरखेल कान्होजी आंग्रे, सरदार शिवाजी इंगळे, हिंमतबहाद्दर विठोजी चव्हाण, भोई बांधव, श्रीमंत सरदार लखुजीराजे जाधवराव, गरुड घराणे, चंद्रवंशी (भोपतराव) श्रीमंत सरदार लुखजीराव घारे, महाशक्तीशाली सरदार संभाजी काटे, सरदार निंबाळकर घराणे, जगदगुरू संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज भक्ती शक्ती स्वराज्यरथ, श्रीमंत हरजीराजे महाडीक, महाशक्तीशाली रणमर्द सरदार संभाजी कोंढाळकर, सरनोबत पिलाजी गोळे, सरदार प्रतापराव गुजर, सरदार वाघोजी तुपे, सरदार, पिलाजीराव शिर्के, श्रीमंत महाराज छत्रसाल बुंदेला धारदेवास, महाराष्ट्राचे श्रीमंत पवार घराणे, समशेर बहाद्दर श्रीमंत दमाजीराव गायकवाड सरकार, श्रीमंत महादजी शिंदे सरकार, गुप्तहेर प्रमुख बहिर्जी नाईक, शिवरत्न शिवा काशीद जीवा महाले, सरदार जीवाजी सुभानजी रणनवरे, सरदार मल्हारजी तुकोजी निगडे, शुरवीर एकोजी शिरोळे, शुरवीर शेलार मामा, राजेश्री सरदार हांडे, सरदार भोईटे, सरदार मांढरे, स्वराज्यनिष्ठ येसाजी कामठे, श्रीमंत हरजीराजे बर्गे,शिवरायांचे शिलेदार डिंबळे, श्रीमंत तापकीर सरदार, वीर सरदार मालोजी भिलारे,पानीपत वीर महादजी माळवदकर, पानीपत वीर महादजी व दादजी हरपळे, प्रतापगड युध्दवीर सहस्त्री सरदार कोडांजी वरखडे, दक्षिण दिग्वीजय वीर मानाजी मोरे, स्वराज्याचे निष्ठावंत सरदार दरेकर , स्वराज्याचे शिलेदार कुंजीर, स्वराज्यनिष्ठ शेळके, वीर फडतरे, राजे साळुंखे चालुक्य राजवंश, स्वराज्यनिष्ठ सरदार बाबर, सिंहगड वीर विठोजी कारके, दुर्ग अजिंक्यतारा वीर किल्लेदार मानाजी साबळे, शुरवीर सावंत स्वराज्यघराणे, सरदार मंबाजी नाईक सोनवणे, सरदार थोरात. सरदार वाबळे, प्रतापगड युध्दवीर सहस्त्री सरदार रामजी पांगारे, स्वामीनिष्ठ खंडो बल्लाळ चिटणीस, वीर बाजीप्रभु देशपांडे या स्वराज्यघराण्यांचे वंशज, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, ढोलताशा पथके, विवीध संस्था सहभागी होणार आहेत.



# यंदा ९० सामाजिक संस्थांना ३९ लाखांचा निधी समर्पण

पुणे (दै. संध्या) :

"शिक्षण नसल्याने नक्षलवाद फोफावला "असे मध्यप्रदेश येथील सामाजिक कार्यकर्त्या व नर्मदालय च्या भारती ठाकूर यांनी प्रतिपादन केले.भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज वेल्फेअर ऑर्गनायझेशन द्वारा आयोजित नवी पेठ येथील निवारा सभागृहात सामाजिक कृतज्ञता निधी समर्पण समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून भारती ठाकूर बोलत होत्या."आमच्या शाळांतून व्यवसायाभिमुख शिक्षण दिले जाते आणि आमचा अभ्यासक्रम आम्हीच बनवला असून गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जाते. पाठांतरावर भर दिला जातो असे प्रतिपादन त्यांनी केले".

बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निधु सक्सेना ह्यांनी यावेळी आपले विचार मांडले. ते असे म्हणाले," बँक ऑफ महाराष्ट्राने प्रगतीचा खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि बँक येत्या दोन ते तीन वर्षांत अजून प्रगतीची वरची श्रेणी मिळवायचा प्रयत्न करीत आहे."

सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्यांची "बोमरेओ" संघटना करीत असलेल्या कार्याची प्रेरणा घेऊन बँक देखील सामाजिक जबाबदारी म्हणूनअसे उपक्रम करायचा विचार करत आहे" असे निधु म्हणाले."गुणवत्ता आणि ग्राहक सेवा यांमध्ये काही तडजोडी न करता उत्कृष्ट सेवा द्यायचा महाराष्ट्र बँकेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले".या कार्यक्रमास संघटनेचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस,नारायण अचलेरकर,मोहन घोळवे, भास्कर माणकेश्वर,डॉ सुनील देशपांडे,ह्यांची मुख्य उपस्थिती होती.प्रारंभी भारती ठाकूर यांचा परिचय सुलभा कुलकर्णी ह्यांनी तर बँकेचे कार्यकारी संचालक व व्यवस्थापकीय संचालक निधु सक्सेना यांचा परिचय डॉ सुनील देशपांडे ह्यांनी करून दिला.

# 'लाईनमन दिवस' केला साजरा

मुंबई (दै. संध्या) :

■ कार्यक्रमात वीज आणि नवीन आणि पुनर्नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्र्यांची उपस्थिती; ६६ हून अधिक जेनको, ट्रान्समिशन परवानाधारक आणि डिस्कॉममधील २५० हून अधिक लाईनमनचा सत्कार

केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए), ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने आज नवी दिल्ली येथे टाटा पॉवर दिल्ली डिस्ट्रिब्युशन लिमिटेडच्या सहकार्याने सहावा 'लाईनमन दिवस' साजरा करण्यात आला. देशभरात वीज सेवांचे विश्वासार्ह वितरण सुनिश्चित करण्यासाठी ज्यांचे योगदान महत्त्वाचे आहे, अशा लाईनमन आणि ग्राउंड मेंटेनन्स कर्मचाऱ्यांचे अथक समर्पण आणि अमूल्य सेवांची दखल घेण्यासाठी लाईनमन दिवस साजरा करण्यात येतो.

या कार्यक्रमाला भारताचे ऊर्जा आणि नवीन व पुनर्नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद येसो नाईक उपस्थित होते. ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल यांनी बीज भाषण केले. सीईएचे अध्यक्ष श्री. घनश्याम प्रसाद आणि अन्य सदस्य, टाटा पॉवर-डीडीएलचे सीईओ श्री द्विजदास बसक यांच्यासह वरिष्ठ नेते आणि ऊर्जा क्षेत्रातील प्रतिष्ठित भागधारक यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात भारतातील ६६ हून अधिक राज्यांच्या तसेच खाजगी क्षेत्रातील वीज वितरण आणि निर्मिती कंपन्यांमधील सुमारे २५० लाईनमन आणि पर्यवेक्षक, तसेच ट्रान्समिशन परवानाधारक सहभागी झाले होते. एकमेकांच्या अनुभवांची देवाणघेवाण करणे, अखंडित वीजपुरवठा राखताना उद्भवणाऱ्या कामकाजात्मक आव्हानांवर चर्चा करणे आणि सहभागींमध्ये सहयोगी शिक्षणाला प्रोत्साहन देतानाच सुरक्षितता पद्धतींबद्दल माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी यातून व्यासपीठ उपलब्ध करण्यात आले.

या मेळाव्याला संबोधित करताना श्री. श्रीपाद येसो नाईक म्हणाले की, राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहादरम्यान साजरा केला जाणारा लाईनमन दिवस हा देशभरात अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करणाऱ्या वीज क्षेत्रातील आघाडीच्या कामगारांच्या समर्पणाला दाद देण्याकरिता आहे. कामाच्या ठिकाणी वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणांचा सातत्याने वापर, देखभालीचे काम करण्यापूर्वी योग्य शटडाउनची पुष्टी आणि नियमित क्षमता बांधणी व प्रशिक्षण पुरवून सुरक्षा संस्कृती मजबूत करण्याची गरज यावर त्यांनी भर दिला.

स्मार्ट ग्रिड्स, रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टम, एआय-सक्षम प्रेडिक्टिव मेंटेनन्स आणि ड्रोन-आधारित तपासणी यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने संभाव्य दोष अगोदरच ओळखण्यास आणि फील्ड कर्मचाऱ्यांना होणारा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते यावर त्यांनी भर दिला. 'सेवा, सुरक्षा, स्वाभिमान' ही सहाव्या लाईनमन दिवसाची संकल्पना असल्याचे नमूद करून ते म्हणाले की वीज क्षेत्रातील आघाडीच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेची भावना त्यात प्रतिबिंबित झाली आहे.

लाईनमन हे वीज क्षेत्रातील योद्धे असल्याचा उल्लेख करून ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल यांनी कठोर हवामान किंवा नैसर्गिक आपत्तींमध्ये, जेव्हा लोक घरात असतात, तेव्हा लाईनमन वीज पुन्हा सुरू करण्यासाठी वीजपुरवठा सतत सुरू राहावा यासाठी बाहेर पडतात याकडे लक्ष वेधले. या



क्षेत्रात स्वयंचलितता (ऑटोमेशन) वाढत असले तरी जमिनीवर असलेले लाईनमनच शेवटी यंत्रणा पूर्ववत करतात आणि नेटवर्क चालू ठेवतात, हे त्यांनी नमूद केले. सर्व फील्ड कर्मचाऱ्यांना प्रमाणित सुरक्षा किट आणि साधनांनी सुसज्ज केले पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

कार्यक्रमात बोलताना सीईएचे अध्यक्ष श्री. घनश्याम प्रसाद यांनी एक लवचिक आणि विश्वासार्ह वीज क्षेत्र हे विकसित राष्ट्राचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे हे अधोरेखित केले. तसेच आव्हानात्मक परिस्थितीत अखंड वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी काम करणाऱ्या लाईनमनच्या अथक प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली. देशभरातील युटिलिटीजच्या वाढत्या सहभागामुळे लाईनमन दिवस ही एक देशव्यापी चळवळ बनली आहे. त्यातून राष्ट्र उभारणीत लाईनमनच्या महत्त्वाच्या भूमिकेला मान्यता वाढत असल्याचे दिसून येते, हे त्यांनी नमूद केले. या मान्यतेसोबत आघाडीच्या या कामगारांना अधिक बळकट संरक्षण आणि सक्षमीकरण मिळायला हवे, यावर त्यांनी भर दिला.

या उपक्रमाच्या महत्त्वाबद्दल बोलताना टाटा पॉवर दिल्ली डिस्ट्रिब्युशन लिमिटेडचे सीईओ श्री. द्विजदास बसक म्हणाले, "'लाईनमन दिवस' हे आमच्या आघाडीच्या योद्ध्यांना समर्पित असे अद्वितीय व्यासपीठ आहे. त्यातून केवळ त्यांच्या प्रचंड योगदानाचा सन्मान करण्यात येत नाही, तर त्यांचा ध्वनीही वाढविण्यात येतो. त्यामुळे त्यांना त्यांचे अनुभव आणि आव्हाने मांडणे शक्य होते आणि त्यांच्या सुरक्षितता व कल्याणाप्रति आमची सामूहिक वचनबद्धता बळकट होते. एक चिवट वीज क्षेत्र सक्षम आणि सुरक्षित आघाडीच्या कामगारांपासून सुरू होते, असा टाटा पॉवर-डीडीएलमधील आमचा ठाम विश्वास आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे...



## लहान हातांनी साकारलेल्या मोठ्या स्वप्नांची 22 वर्षे - युवा मास्टरस्ट्रोक 2025

■ ६,६०० शाळांमधील केजी ते इयत्ता दहावीपर्यंतच्या छोट्या कलाकारांनी सर्जनशीलतेला सीमा नसल्याचे केले सिद्ध

पुणे (दैनिक संध्या) : नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या युवातर्फे आयोजित 'युवा मास्टरस्ट्रोक'च्या २२व्या पर्वाची यशस्वी सांगता झाली. ऑगस्ट ते डिसेंबर या कालावधीत या अखिल भारतीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नर्सरीपासून इयत्ता दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या निमित्ताने चित्रकलेच्या माध्यमातून आपली सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि विचार व्यक्त करण्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. दोन दशकांहून अधिक काळापूर्वी सुरू झालेला हा उपक्रम आज एका सर्जनशील चळवळीत परिवर्तित झाला आहे. २०२५च्या पर्वाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारतभरातील ६,६००हून अधिक शाळांमधील २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने या स्पर्धेत सहभाग घेतला. केवळ प्रतिभेचा गौरव करणे इतकेच या उपक्रमाचे उद्दिष्ट नसून, कलेच्या या सर्वांना समजणाऱ्या माध्यमातून विद्यार्थी गुंतागुंतीचे विचार आणि भावना व्यक्त करण्यास चालना देणारी संस्कृती घडवण्याचा या उपक्रमाचा हेतू आहे. युवा मास्टरस्ट्रोक २०२५ या स्पर्धेच्या प्रत्येक वयोगटातील विजेत्यांची नावे https://masterstroke.navneet.com/ या वेबसाइटवर जाहीर करण्यात आली आहेत. श्री. भारत पार्टे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय प्रवेशिकांचे परीक्षण करण्यात आले. जे. जे. कला महाविद्यालयाची पार्श्वभूमी आणि कला क्षेत्रातील अनेक दशकांचा अनुभव असलेल्या श्री. पार्टे यांनी चित्रकृतींचे परीक्षण केले आणि या स्पर्धेचा एकूण उत्साह अधिक उंचावला.

## आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेसंदर्भात बालसुरक्षेबाबत प्रशासकीय समितीची बैठक

आळंदी (दैनिक संध्या) : श्री क्षेत्र आळंदी व परिसरातील वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक शिक्षण देणाऱ्या विविध संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात तसेच बालकांवरील लैंगिक शोषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या विशेष प्रशासकीय समितीची महत्त्वाची बैठक मंगळवारी आळंदी नगरपरिषद कार्यालयात पार पडली. या बैठकीचे अध्यक्षपद खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी भूषविले. समितीचे सचिव तथा आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर व नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्यासह प्रशासनातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत वारकरी शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचे अत्याचार किंवा लैंगिक शोषण होऊ नये यासाठी प्रशासनाकडून कोणत्या ठोस उपाययोजना राबविणे आवश्यक आहे, यावर चर्चा करण्यात आली. तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोस्को) याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. संस्थांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, विद्यार्थ्यांसाठी तक्रार पेटी उपलब्ध करून देणे, नियमित समुपदेशनाची व्यवस्था करणे तसेच बालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. प्रशासनामार्फत लवकरच या संदर्भात मानक कार्यपद्धती (SOP) तयार करण्यात येणार असून संबंधित सर्व संस्थांनी त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील, असे या बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीस जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रोहिणी ढवळे, आळंदी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भिमा नरके, दिघी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, ससून रुग्णालयाचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ.सचिन महाजन, आरोग्य अधिकारी आर.बी.ढाकणे, मुख्याध्यापक संतोष मरभळ, पोलीस उपनिरीक्षक डी.एस. जाधव, एम.एन.शेंडे, अर्जुन घोडे, समुदाय संघटक, आळंदी नगर परिषद उपस्थित होते.



# इसुझू मोटर्स इंडियाच्या वरिष्ठ व्यवस्थापनात फेरबदल

पुणे (दै. संध्या) :

■ तकेशी हिरानो यांनी इसुझू मोटर्स इंडिया (आयएमआय) चे व्यवस्थापकीय उपसंचालक पद स्वीकारले

इसुझू मोटर्स इंडिया (आयएमआय), ही जपानच्या इसुझू मोटर्स लिमिटेडची उपकंपनी असून त्यांनी वरिष्ठ व्यवस्थापनात मुख्य फेरबदलाची घोषणा केली.

जपानमधील इसुझू बिझनेस डिव्हिजन, मित्सुबिशी कॉर्पोरेशन येथे कार्यरत असलेले तकेशी हिरानो यांची इसुझू मोटर्स इंडिया (आयएमआय)चे व्यवथापकीय उपसंचालक म्हणून नियुक्ती होण्यापूर्वी तोरू किक्षिमोतो हे पदभार सांभाळत होते.

तकेशी हिरानो यांना इसुझूसाठी जागतिक बाजारपेठेत वितरण तसेच विपणन (मार्केटिंग)चा दोन दशकांहून अधिक अनुभव आहे. इसुझू मोटर्स आणि मित्सुबिशी कॉर्पोरेशनसाठी विविध बाजारपेठांमध्ये कामकाजाच्या देखरेखीसाठी विविध क्षमतांमध्ये काम करण्याचा समृद्ध अनुभव त्यांच्याकडे आहे. भारतीय बाजारपेठेची सखोल ओळख आहे. त्यांनी यापूर्वी इसुझू मोटर्स इंडियामध्ये उपाध्यक्ष-विक्री आणि विपणन म्हणून काम केले आहे. जिथे त्यांनी भारतीय बाजारपेठेचा पाया रचण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तोरू किशिमोतो हे जपानमधील मूळ कंपनीत नवीन कार्यभार स्वीकारतील.

कंपनी व्यवस्थापनात करण्यात आलेला हा फेरबदल व्यवसायविषयक योजनेनुसार करण्यात आलेला आहे.

# कोटक ऑल्ट्सने पहिल्या कॅटलिस्ट अवॉर्ड्स विजेत्याची केली घोषणा

पुणे (दै. संध्या) :

फायनॅनष्यल कंटेंट क्रिएशनमध्ये उत्कृष्ट आणि जबाबदारीपूर्वक काम करणाऱ्याची कदर करण्यासाठी सुरू केलेल्या कोटक कॅटलिस्ट अवॉर्ड्स या राष्ट्रव्यापी उपक्रमांतर्गत कॅटलिस्टच्या पहिल्या आवृत्तीच्या विजेत्याचे नाव घोषित करण्यात आले आहे. कोटक ऑल्टरनेट ॲसेट मॅनेजर्स लिमिटेड ("कोटक ऑल्ट्स")ने आज हिमानी चौधरी यांचे नाव विजेता म्हणून घोषित केले असून त्यांना 25 लाख रु. पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अशाप्रकारे, भारतातील फायनॅनष्यल कंटेंट क्रिएटर्ससाठी कॅटलिस्ट हा एक अत्यंत अर्थपूर्ण सन्मान ठरला आहे.

कोटक ऑल्ट्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्रीनी श्रीनिवासन म्हणाले, " भारतात आर्थिक साक्षरतेच्या बाबतीत लक्षणीय योगदान देणाऱ्या कंटेंट क्रिएटर्सच्या सन्मानार्थ कोटक ऑल्ट्स कॅटलिस्ट अवॉर्ड्सची सुरुवात करण्यात आली होती. गुंतवणूकदारांचा सहभाग वाढत असताना त्यांना स्पष्टता, संदर्भ आणि विश्वसनीयता अपेक्षित आहे. क्रिएटर्सकडून आम्हाला उदंड प्रतिसाद मिळाला आणि तो वित्तीय शिक्षण देणाऱ्या नव्या पिढीकडे संकेत करतो. पहिल्या




विजेत्या श्रीमती हिमानी चौधरी अशा आर्थिक संवादाचे उदाहरण सादर करतात, ज्याला कॅटलिस्ट प्रोत्साहन देऊ इच्छितो."

कोटक ऑल्ट्स कॅटलिस्ट अवॉर्ड्सच्या पहिल्या आवृत्तीसाठी 19 राज्यांमधील एकूण सहाशे पेक्षा जास्त प्रवेशिका प्राप्त झाल्या. त्या 8 वेगवेगळ्या भाषांमध्ये होत्या. यावरून आर्थिक जागरुकता घडवण्यात डिजिटल क्रिएटर्सची वाढती भूमिका स्पष्ट होते. आर्थिक ईकोसिस्टममधील वाढता गोंधळ आणि भ्रामक माहिती यांना प्रत्युत्तरादाखल सुरू करण्यात आलेला कॅटलिस्ट हा पुरस्कार अशा क्रिएटर्सचा सन्मान करतो, जे अचूकता, पारदर्शकता आणि गुंतवणूकदाराचे हित आपल्या कामाच्या केंद्रस्थानी ठेवतात.

हिमानी चौधरी यांच्या 'पर्सनल फायनॅन्स अँड मेजर फायनॅन्स अपडेट्स' या कंटेंटला त्यातील निःसंदिग्धता, अस्सलता आणि विश्वसनीयतेबद्दल गौरविण्यात आले. गुंतागुंतीच्या आर्थिक संकल्पना अत्यंत स्पष्ट आणि निटनेटक्या पद्धतीने मांडण्याची या कंटेंटची क्षमता ज्यूरीने नमूद केली आहे. तसेच या कंटेंटला सखोल संशोधन आणि त्याच्या व्हायरल होण्यापेक्षा गुंतवणूकदाराला सुशिक्षित करण्यावरील निरंतर फोकसची जोड असल्याचेही नमूद केले आहे.

मूल्यमापनाची प्रक्रिया काटेकोर आणि पारदर्शक असावी यासाठी EY द्वारे या अवॉर्ड्सचे फ्रेमवर्क तयार करण्यात आले होते तसेच त्याचे ऑडिट करण्यात आले होते. एका शैक्षणिक ज्यूरीने सर्वोच्च तीस प्रवेशिकांचे मूल्यमापन केले.

त्यानंतर अंतिम फेरीतील 10 प्रवेशिकांचे मूल्यमापन एका भल्या मोठ्या ज्यूरीने केले. यामध्ये CRED चे संस्थापक आणि CEO कुणाल शाह, एडलवाईस म्यूचुअल फंडच्या मॅनेजिंग डायरेक्टर आणि CEO राधिका गुप्ता, बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपमधील मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीनियर पार्टनर अल्पेश शाह यांचा समावेश होता; कॅपिटल मार्केट्स आणि नियामक क्षेत्रातील व्यापक अनुभव असणाऱ्या, SEBI चे माजी पूर्ण वेळ सदस्य श्री. अनंत नारायण यांनी सदर ज्यूरीचे प्रमुखपद भूषवले.

कॅटलिस्ट अवॉर्ड्स अशा आर्थिक कंटेंट क्रिएटर्सना सन्मानित करतो, जे आर्थिक साक्षरता, गुणवत्ता आणि गुंतवणूकदारांचे दीर्घकालीन हित यांना प्राधान्य देतात. या उपक्रमाच्या माध्यमातून एका जबाबदार आर्थिक संवादाला चालना देण्याचे तसेच देशभरात माहितीपूर्ण आणि आत्मविश्वासाने भरलेला गुंतवणूकदार घडवण्यात मदत करण्याचे कोटक ऑल्ट्सचे ध्येय आहे.

# स्टिंगकडून महिला दिनाच्या गौरवानिमित्त इन्स्टाग्रामवर खास सलाम

पुणे (दै. संध्या) :

पेप्सिको इंडियाचे हाय-व्होल्टेज एनर्जी ड्रिंक असलेल्या स्टिंग एनर्जी® ने महिलांच्या 2025 च्या विजयासह भारताच्या सहा क्रिकेट विजयांचा गौरव करताना एक धमाकेदार इंस्टाग्राम पोस्ट केली आहे. ही पोस्ट ब्रँडच्या खास "स्टिंगगगग" सळसळत्या उर्जेसह पुरुष आणि महिलांच्या विजयी षट्काराच्या ऐतिहासिक क्षणांचा तसेच खेळांमधील सर्वसमावेशकतेचा गौरव करते. पोस्टची लिंक: https://www.instagram.com/p/DVouHpfk_bb/?hl=en




युवराज सिंग आणि रवी शास्त्री यांचा समावेश असलेल्या स्टिंग एनर्जीच्या "लाँगर द सिक्स, लाऊडर द स्टिंग सोनिक" मोहिमेशी संबंधित असलेली ही पोस्ट क्रिकेटमधील सर्वोच्च आनंददायी क्षण पुनरूज्जीवित करते. त्यातून भारताच्या १९८३, २००७, २०११, २०२४ मधील विजयांवर तसेच महिला दिनी आपल्या संघाचा झालेला विजय व महिलांचा २०२५ मधील पहिल्या विजयाचीही उजळणी यात करण्यात आली आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू युवराज सिंग आणि रवी शास्त्री यांच्या प्रमुख भूमिका असलेली एक उत्साहाने सळसळती चित्रफीत आहे. उन्हात तळपणाऱ्या क्रिकेटच्या मैदानात या दोघांमधील चेष्टामस्करीचे रूपांतर लगेचच टोलेजंग षट्कारांमध्ये होते. युवराज मोठमोठे फटके मारतो आणि स्टिंगच्या सिग्नेचर सोनिक वेगाला देतो. लहान चौकारांसाठी एक धमाल "स्टिंग" आणि लांबवर फटक्यांसाठी धडाकेबाज "स्टिंगगगग" आपल्याला पाहायला मिळतो. रवी शास्त्री यांची लोकप्रिय कॉमेंटरीही इथे ऐकू येते. त्यांचा आवाज खेळपट्टीवर घुमतो आणि वेगाने वाढत जातो. हे फक्त एक देखणे दृश्य नाही तर एक श्रवणानंद आहे जो प्रत्येक षट्काराचा रोमांच नसानसात भिनवतो. आपल्याला एक अद्भुत आणि रोमांचक अनुभव देतो.


## पुणे महानगरपालिका, पुणे

भवन रचना विभाग

निविदा प्रक्रिया कक्ष

निविदा जाहिरात - फेर निविदा कामे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ई-निविदा विक्री कालावधी | : | ११/०३/२०२५ | दुपारी २.३० वा. वाजेनंतर | ते | १८/०३/२०२६ | दुपारी २.३० | वाजेपर्यंत |
| २) | निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ | : | ११/०३/२०२५ | दुपारी २.३० वा. वाजेनंतर | ते | १८/०३/२०२६ | दुपारी २.३० | वाजेपर्यंत |
| ३) | तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक | : | २०/०३/२०२५ | दुपारी ३.०० वा. वाजेनंतर | | | | |

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रुपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पी.एम.सी./भवन /२४६/२०२५-२६ | भवन रचना विभाग | प्रभाग क्र. १९ लहुजी क्रीडा संकुल फिटनेस सेंटर येथे विविध विकास कामे करणे व साहित्य खरेदी करणेस. | २८७३०७३ | २८७३१ | ४ महिने (पावसाळा कालावधीसह) | १३५९ | श्री. रमीज फरास ८८३०७११७७९ |

टिप : जाहिरात क्र. २/१४२८ दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या यापूर्वी मजकूर हा वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेला आहे.

(स्वाक्षरी/-)
कार्यकारी अभियंता
भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/१७८९ दि. १०/०३/२०२६



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील तसेच मौजे मु. पो. बोरबावडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल सौ. कविता सचिन पाष्टे, उ.व. २५, धंदा-मजुरी, रा. द्वारा नामदेव संतू भालेकर, मु. पो. कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी सांगितलेवरुन जाहीर नोटीस देण्यात येते की,

आमचे आशिलांचा विवाह सात वर्षांपुर्वी बांद्रा, मुंबई येथे रजिस्टर पध्दतीने सचिन पांडुरंग पाष्टे, रा. मु. पो. बोरबावडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथे झाला असून सदरहू विवाह संबंधातून आमचे आशिलांस त्यांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांचेपासून एक मुलगी वय वर्षे ६ ही सावित्रीबाई फुले या दवाखान्यात झालेली आहे. विवाह झाल्यानंतर आमचे आशिलांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांनी काही दिवस व्यवस्थीत नांदविले. सदर आमचे आशिल हे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांचेबरोबर स्वतंत्र त्यांचे सासु-सासऱ्यांपासून वेगळे राहात होते. त्यानंतर आमचे आशिलांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे हे सतत दारु पिवून येणे, आमचे आशिलांस मारहाण करणे याप्रमाणे वागू लागले. आमचे आशिलांना पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांचेपासून विवाह संबंधातून झालेली मुलगी ही दोन महिन्यांची असताना आमचे आशिल हे त्यांचे माहेरी मौजे कुसूर, ता. जुन्नर, जि. पुणे येथे राहावयास आले तेव्हापासून ते आजपर्यंत आमचे आशिल हे माहेरीच राहात आहेत. आमचे आशिल या सासरी नांदत असताना आमचे आशिलांचे पती हे कोणताही कामधंदा करीत नसत. सतत दिवसभर दारु पित असे व झोपून राहात असे. त्यामुळे आमचे आशिल व त्यांचे मुलीवर उपासमारीची वेळ आली होती. आमचे आशिलांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांनी घरातील सर्व भांडीकुंडी देखील दारुच्या व्यसनापायी विकून टाकलेली आहेत. आमचे आशिल या माहेरी आल्यापासून एकदाही त्यांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे हे आमचे आशिलांस अगर मुलीला भेटण्यास आलेले नाहीत अगर आमचे आशिल व मुलीची साधी विचारपूस देखील केलेली नाही. त्यामुळे आमचे आशिलांना आता यापुढे त्यांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांचेबरोबर कोणताही वैवाहिक संबंध ठेवावयाचा नसून सदरहू विवाह बंधनातून मुक्त होण्याचे आमचे आशिलांनी ठरविलेले आहे. त्यामुळे आमचे आशिलांना त्यांचे पती श्री. सचिन पांडुरंग पाष्टे यांचेसोबतचे असलेले वैवाहिक संबंध संपुष्टात आणावयाचे असल्याने व त्यांना दुसरा घरोबा करावयाचा असल्याने आमचे आशिल सदरहू जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

तरी यापुढे आमचे आशिलांचा त्यांचे पती सचिन पांडुरंग पाष्टे, रा. मु. पो. बोरबावडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांचेबरोबर असलेले वैवाहिक संबंध ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून संपुष्टात आणीत आहेत व वेगळा घरोबा करण्यास मुक्त आहेत असे प्रस्तुतचे जाहीर नोटीसीने जाहीर करीत आहेत.

सदरहू जाहीर नोटीस मुद्दामहून वैवाहिक संबंध संपुष्टात आणणेकामी प्रसिध्दी केली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. १०/०३/२०२६

सही/-
श्री. विलास दत्तात्रय पवार
बी. कॉम. एल एल. बी.
ॲडव्होकेट
मो. नं. ९९६०३५८८१४
रा. ११४, ब्राम्हण बुधवार पेठ, जुन्नर,
ता. जुन्नर, जि. पुणे. पिन ४१० ५०२.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गंगानगरमध्ये मोबाईल टॉवरला आग

पिंपरी (दैनिक संध्या) : आकुर्डी येथील गंगानगर परिसरात एका मोबाईल टॉवरला अचानक आग लागल्याची घटना घडली. आज सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास टॉवरमधून धूर आणि ज्वाळा निघत असल्याने परिसरात काही काळ नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महापालिका अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्परतेने प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र मोबाईल टॉवरला आग लागण्याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नसून संबंधित यंत्रणेकडून तपास सुरू आहे.



### आरएमसी प्लांट व बांधकाम साहित्य पुरवठादारांना महापालिकेचे आदेश

■ वायू प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर पावले

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शहरातील आर.एम.सी. (Ready Mix Concrete) प्लांट, बांधकाम स्थळे तसेच बांधकाम साहित्य साठवणूक ठिकाणी धूळ व वायू प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार आर.एम.सी. प्लांट तसेच बांधकाम स्थळांवर धूळ नियंत्रणासाठी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र काही ठिकाणी या सूचनांचे पालन होत नसल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) मोजणी केंद्रांच्या नोंदीनुसार शहरातील हवेची गुणवत्ता सध्या मध्यम (AQI १०० ते १५०) या श्रेणीत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व आर.एम.सी. प्लांट धारक, बांधकाम व्यावसायिक तसेच बांधकाम साहित्य पुरवठादार यांनी धूळ व वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात, असे आवाहन पिंपरी चिंचवड मनपामार्फत करण्यात आले आहे. संबंधित आस्थापनांची महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत नियमित तपासणी करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच जोपर्यंत जोपर्यंत सदर उपाययोजना करण्यात येत नाही तोपर्यंत आस्थापना बंद ठेवण्यात येणार आहेत. गरज भासल्यास संबंधित आस्थापना सील करण्याची कारवाई देखील करण्यात येईल, असा इशाराही पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिला आहे.

### वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नगरसेविका स्नेहा कलाटे मैदानात



पिंपरी (दैनिक संध्या) : वाकड मेन चौक येथे वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर नगरसेविका स्नेहा रणजीत कलाटे या मैदानात उतरल्या आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष स्थळाची त्यांनी पाहणी केली आहे. बीआरटी बस स्टॉपचे स्थलांतर आणि बीआरटी लेन काढून टाकण्याबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत असल्याने या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. तसेच वाहतूक कोंडी सोडवण्याकरिता स्नेहा कलाटे यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सूचनाही केल्या आहेत. या वाहतूक कोंडी संदर्भात नगरसेविका स्नेहा कलाटे यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त, पीएमपीएमएल प्रशासन तसेच वाकड वाहतूक विभागाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला आहे. त्यानुसार आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहरी दळणवळण विभागाचे उपअभियंता चंद्रकांत मोरे, कनिष्ठ अभियंता अमोल पाचांगणे, पीएमपीएमएलचे फिल्ड ऑफिसर गायकवाड तसेच वाकड वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बापू ढेरे, उपपोलीस निरीक्षक नवनाथ खेडकर व पोलीस हवालदार बापू पोटे यांच्यासह नगरसेविका स्नेहा कलाटे यांनी वाकड मेन चौक येथे भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी बस स्टॉपची सध्याची जागा, बीआरटी लेनमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी तसेच वाहतूक कोंडीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. परिसरातील नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता लवकरात लवकर योग्य उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे स्नेहा कलाटे यांनी सांगितले आहे. नागरिकांना सुरळीत व सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी पुढील काळातही सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला जाईल, अशी माहिती नगरसेविका स्नेहा रणजीत कलाटे यांनी दिली.



# पराक्रमाचा वारसा जपून हिंदू एकजूट वाढवूया

निगडी (दै. संध्या) :

**ह.भ.प सुश्री.सुप्रियाताई साठे**

भारतीय स्त्री ही आपल्या कुटुंबाचा प्रमुख आधार, तसेच ती या देशाचाही आधार असते, जिजाऊ साहेब होत्या म्हणून शिवराय घडले. तसेच आजही सीमेवर रक्षण करणाऱ्या जवानांच्या पाठीशी त्यांची आई, पत्नी, बहीण खंबीरपणे उभ्या आहेत, त्यामुळे हे राष्ट्र टिकून राहील. कारण स्त्रिया यादेखील राष्ट्राचा प्रमुख आधार म्हणून कार्यरत आहेत, भारतीय स्त्रियांच्या पराक्रमाचा वारसा जपून समस्त हिंदूची एकजूट घडवून आणूया असे आवाहन राष्ट्रीय कीर्तनकार, प्रखर वक्त्या ह.भ.प. सुश्री सुप्रियाताई साठे- ठाकूर यांनी केले. हिंदू एकता रुपीनगर येथे आयोजित केलेल्या महिला हिंदू संमेलन व भारत मातेची आरती या कार्यक्रमात त्या व्यासपीठावरून बोलत होत्या. शर्वरीताई येरगट्टीकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदुत्वाच्या पंचपरिवर्तन या मुद्यांची माहिती दिली ज्यामध्ये स्वतःच्या संस्कृती बद्दल आदर बाळगणे हे स्त्रियांचे कर्तव्य आहे, तसेच नागरिक शिष्टाचार पाळणे, कुटुंब व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणे, जातीभेदाच्या पलीकडे जाऊन समरसता पूर्ण व्यवहार करणे व पर्यावरण रक्षण व संवर्धन करणे हे स्त्रियांचे कर्तव्य आहे असे मत मांडले. यावेळी शेकडो महिलांच्या हस्ते भारत मातेची आरती करण्यात आली होती.

अनेक मुली व माता-भगिनी या विविध राष्ट्रमातांच्या वेशभूषा केल्या होत्या. मुलींचे लाठीकाठी सादरीकरण झाले, महिला भजनी मंडळातर्फे भजने सादर करण्यात आली. सदर कार्यक्रमाला रुपीनगर तळवडे परिसरातील लोकप्रतिनिधी तसेच सर्व राजकीय पक्षाच्या महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन रुपीनगर मधील समस्त महिला भगिनींनी केलेले होते. आगामी काळात हिंदुत्वाच्या व राष्ट्राच्या आरक्षणासाठी असेच वेळोवेळी एकत्र येण्या चा संकल्प उपस्थित सर्व महिलांनी घेतला.

## आरएमसी ट्रकच्या चाकाखाली चिरडून १८ वर्षीय तरुणीचा मृत्यू

पिंपरी (दै. संध्या) :

बावधन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुसगाव येथे भरधाव आरएमसी ट्रकच्या धडकेत १८ वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अंजली शंकर साळवे असे मृत तरुणीचे नाव असून हा भीषण अपघात परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अंजली साळवे ही आपल्या दुचाकीवरून सुस–नांदे रोडने जात होती. ती शिवबा चौकाजवळ आली असता पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या आरएमसी ट्रकने तिच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे अंजली रस्त्यावर पडली आणि ट्रकच्या चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच बावधन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.




पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ट्रक चालक राजपाल कसबे याला अटक केली आहे. तसेच सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसवल्याप्रकरणी सूर्या कन्स्ट्रक्शनचे मालक गणेश कलशेट्टी यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातामुळे सुसगाव परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून जड वाहनांच्या बेदरकार वेगावर नियंत्रण ठेवण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## सारंगी करंजावणे हिने पटकावला मानाचा पुरस्कार

पिंपरी (दै. संध्या) :

मोटरस्पोर्ट्स क्षेत्रातील प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या 'डर्ट ट्रॅक रेस 2026' या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत चैतन्य विद्या प्रतिष्ठानच्या पेरिविंकल इंग्लिश मीडियम स्कूल (सूस शाखा) येथील इयत्ता अकरावीची विद्यार्थिनी सारंगी करंजावणे हिने मानाचा पुरस्कार पटकावला आहे. तिच्या या यशामुळे शाळेसह संपूर्ण परिसरात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मोटरस्पोर्ट्ससारख्या साहसी आणि आव्हानात्मक क्षेत्रात जिद्द, मेहनत आणि धाडसाच्या जोरावर सारंगीने हे यश संपादन केले. तिच्या या कामगिरीची दखल घेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने तिला विशेष रेडिओ मुलाखतीसाठीही आमंत्रित करण्यात आले आहे.

या यशाबद्दल बोलताना चैतन्य विद्या प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र बांदल म्हणाले की,




"विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा, साहस आणि विविध कौशल्यांच्या क्षेत्रातही आपली प्रतिभा दाखवणे आवश्यक आहे. सारंगीने दाखवलेले धाडस आणि जिद्द इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. अशा विद्यार्थ्यांमुळे संस्थेचे नाव अधिक उज्ज्वल होते."

शाळेच्या मुख्याध्यापिका निर्मल पंडित यांनीही सारंगीचे कौतुक करत सांगितले की, "सारंगीची मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास यामुळे तिने हे यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात सातत्याने प्रयत्न केले तर मोठी यशे मिळवता येतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे."

सारंगीच्या या यशामागे मुख्याध्यापिका निर्मल पंडित यांच्यासह पर्यवेक्षक सचिन खोडके, नेहा माळवदे, स्मिता श्रीवास्तव आणि शाळेतील शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे. तसेच तिच्या पालकांचेही मोलाचे सहकार्य आणि पाठबळ तिच्या यशामागे महत्त्वाचे ठरले आहे.

सारंगीचे वडील सचिन करंजावणे हे प्रसिद्ध बाईक रायडर असून त्यांनी अनेक देशांमध्ये रायडर म्हणून कामगिरी केली आहे. तिची आई उच्च शिक्षित असून त्या एका खाजगी कंपनीत व्यवस्थापिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्या मानवी हक्क संरक्षण आणि जागृती, पिंपरी-चिंचवड शहर संघटनेच्या शहराध्यक्षा म्हणूनही कार्यरत आहेत.


> सारंगीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पेरिविंकल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. भविष्यातही ती अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## पिंपरीत दोन दिवसीय 'ग्रंथोत्सव'चे आयोजन

पिंपरी (दै. संध्या) :

उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १४ व १५ मार्च २०२६ दोन दिवसीय आर्य समाज पुस्तकालय व मोफत वाचनालय, पिंपरी कॉलनी, महर्षी दयानंद मार्ग, पिंपरी, येथे 'ग्रंथोत्सव-2025' चे आयोजन करण्यात येणार आहे.

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्‌घाटन होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष लेखक व साहित्यिक प्रा.डॉ. शरद गायकवाड असणार आहे. यावेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन, विक्री आणि त्यासोबतच विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. ग्रंथोत्सवाचा समारोप १५ मार्च रोजी जेष्ठ साहित्यिक



बाबा भांड, यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती श्रेया गोखले यांनी दिली दिली आहे.

शनिवारी पहिल्या सत्रात सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. पिपंरी परिसरातील शालेय विद्यार्थी व जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी यांचा सहभागी होणार आहे. त्यानंतर सकाळी ११.३० वा. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन, दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते ४ या वेळेत त लोकमाता ते राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर" या विषयांवर डॉ. अनुजा कुलकर्णी यांचे व्याख्यान तसेच दुपारी ४ ते ५.३० या वेळेत 'गझल: वाटचाल उर्दूतून मराठीकडे' सादरकर्ते प्रदीप निफाडकर यांचे माहितीपर व्याख्यान होणार आहे.


रविवारी पहिल्या सत्रात सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत कलाविष्कारः शालेय विद्यार्थी कला गुण सादरीकरण हा विद्यार्थ्यांच्या गुणविशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून शाळा व सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहे. दुपारी २ वा. चला समृध्द पिढी घडवूयाः वाचन संस्कारांच्या माध्यमातून सीमा शिंदे, जि.प. शिक्षिका यांचे विद्यार्थी व पालकांसाठी मार्गदर्शन होणार आहे. दुपारी ४ वा. इनुची गोष्ट- या पुस्तकाचे लेखक युनूस सय्यद यांची प्रकट मुलाखत लेखिका आशा नेगी घेणार आहेत.

> दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध नामांकित प्रकाशकाच्या दर्जेदार पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी १० ते रात्री ६ वाजेपर्यंत असून प्रवेश विनामूल्य आहे. तरी सर्व नागरिक व ग्रंथप्रेमी रसिकांनी या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा व ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजनेसाठी उत्पन्न दाखला गरजेचा

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना वैद्यकीय उपचारांसाठी मदत मिळावी, या उद्देशाने महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये गंभीर आजार, उपचार किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी अडचणीत असलेल्या नागरिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे. प्रशासकीय राजवटीमध्ये ही योजना बंद पडली होती. महापौर रवी लांडगे यांनी ती योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना त्यांच्या उपचारासाठी रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे (चेक) पाच हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. त्यामुळे उपचारासाठी आवश्यक असलेला आर्थिक भार काही प्रमाणात कमी होऊन



नागरिकांना वेळेवर उपचार घेणे शक्य होणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी रूग्ण किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी महापौर कार्यालयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत रुग्णाचे आधारकार्ड, रेशनकार्डाची प्रत, तहसीलदार कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला, स्थानिक नगरसेवकांचे शिफारसपत्र आणि रुग्णालयाकडून देण्यात आलेले डॉक्टरांच्या सही व शिक्क्याचे उपचार खर्चाचे अंदाजपत्रक आवश्यक आहे.




## प्रत्येक महिलेने दिवसातून थोडा तरी वेळ स्वतःसाठी राखून ठेवत छंद जोपासावेत – उपमहापौर शर्मिला बाबर

पिंपरी (दै. संध्या) :

महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्याला प्राधान्य देत जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःच्या आरोग्याकडे आणि वैयक्तिक आयुष्याकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कामाच्या धकाधकीत अनेकदा महिला स्वतःकडे दुर्लक्ष करतात, मात्र निरोगी शरीर आणि सकारात्मक मन असेल तरच त्या कुटुंब, समाज आणि कार्यस्थळी अधिक सक्षमपणे योगदान देऊ शकतात. त्यामुळे महिलांनी आपल्या दैनंदिन दिनक्रमात आरोग्याची काळजी घेणे, नियमित व्यायाम करणे आणि मानसिक तणावापासून दूर राहण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रत्येक महिलेने दिवसातून थोडा तरी वेळ स्वतःसाठी राखून ठेवत आवडत्या गोष्टींमध्ये वेळ घालवावा. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी ऊर्जा आणि सकारात्मकता मिळू शकेल, असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महिला कर्मचाऱ्यांसाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी मनोगत व्यक्त करताना उपमहापौर शर्मिला बाबर बोलत होत्या. या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सभापती कैलास कुटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, पल्लवी वाल्हेकर,प्रियांका कुदळे यांच्यासह सहआयुक्त मनोज लोणकर, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उपआयुक्त चेतना केरूरे, संदीप खोत, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिका महिला अधिकारी,महिला कार्यकारी अभियंता तसेच कर्मचारी उपस्थित होत्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### माळेगाव पोलीस स्टेशनचा कार्यभार महिला पोलीसांच्या हाती

माळेगाव (दैनिक संध्या) : माळेगाव पोलीस ठाणे येथे आज 08 मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सर्व महिला पोलिस अंमलदार यांनी माळेगाव पोलीस ठाणे चा कार्यभार सांभाळला.यामध्ये ठाणे अंमलदार महिला पोलीस हवालदार शेख,CCTNS महिला अंमलदार गायकवाड, जाधव,वायरलेस महिला पोलीस अंमलदार शिंदे, dail 112 करीता महिला पोलीस अंमलदार केंद्रे आणि सूळ,पासपोर्ट महिला पोलीस अंमलदार बनसोडे,मदतनीस महिला पोलीस अंमलदार बनगर आणि वाहन चालक महिला पोलीस अंमलदार प्रेरणा सावंत असे सर्वांनी मिळून पोलीस स्टेशन चे कामकाज पहिले. कामकाजादरम्यान सपोनी सचिन लोखंडे यांनी महिला दिनानिमित्त सर्व महिलांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.



### बापुसाहेब बोधे यांचे निधन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या): हवेली तालुक्यातील सहकार क्षेत्रातील नामांकित व्यक्तीमत्व कोरेगावमुळ ग्रामपंचायतचे माजी सरपंच, सोसायटीचे माजी चेअरमन, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक कोरेगावमुळ - बोधे काकडे वस्ती येथील बापुसाहेब यशवंत बोधे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. महात्मा गांधी विद्यालय मधील उपशिक्षक राजेंद्र बोधे यांचे वडील आहे. अंत्यसंस्कारास बोधे परिवाराचे नातेवाईक, मित्रपरिवार तसेच तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, वैद्यकीय, आध्यात्मिक, कृषी क्षेत्रातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

### ग्रामोन्नती मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव (ता .जुन्नर ) येथील ग्रामोन्नती मंडळाच्या बी .एड महाविद्यालयात दि .८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील प्रथम वर्षातील छात्राध्यापकांच्या वतीने करण्यात आले होते .कार्यक्रमाला चेअरमन ,प्राध्यापकवर्ग, कर्मचारी आणि छात्राशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले .यानंतर प्रमुख पाहुण्यांनी महिलांच्या सक्षमीकरणाचे महत्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले .सदर कार्यक्रमात डॉ .आर .डी .टाक यांनी स्त्री पुरुष समानता, महिला दिनाचे महत्व ,महिला सक्षमीकरण याबद्दल आपली मते मांडली .तसेच प्रमुख पाहुणे डॉ .एस .ए. पाटोळे यांनी कामाच्या ठिकाणी होणारा महिलांवरील अन्याय ,महिलांची सद्यस्थिती व महिलांनी काय करावे व काय करू नये याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले .कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ .मुरादे सर यांनी महिला दिनाचे महत्व सांगून त्यांनी समाजातील महिलांचे योगदान ,शिक्षणाचे महत्व आणि महिलांच्या हक्कांविषयी आपले विचार मांडले . जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्रथम आणि द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांनी महिला सक्षमीकरण ,समानता आणि शिक्षण याविषयी आपली मते प्रभावीपणे मांडली .या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये महिलांविषयी आदर,समानता आणि सक्षमीकरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली . संस्थेचे अध्यक्ष सुजितभाऊ खैरे ,कार्यवाह कृषिरत्न अनिलतात्या मेहेर ,महाविद्यालयाचे चेअरमन ऋषिकेश मेहेर यांनी महाविद्यालयातील सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या .कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य मुरादे सर ,डॉ .टाक आर .डी .,डॉ .पाटोळे एस .ए .,प्रा .तरटे एस .के .,प्रा .खराडे व्ही .जे .,ग्रंथपाल सय्यद टी .के .,बेनके आर व्ही .,गुंजाळ पी .एस .आदींनी परिश्रम घेतले.



### महापौर चषक स्पर्धेत शिवकालीन युद्धकला समाविष्ट करण्याची मागणी

आळंदी (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या महापौर चषक क्रीडा स्पर्धांमध्ये शिवकालीन युद्धकलेचा समावेश करावा, अशी मागणी नगरसेविका रुपाली धाडवे व माजी नगरसेवक दिनेश धाडवे यांनी पुण्यनगरीच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे प्रतीक असलेल्या मर्दानी खेळ, तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी-काठी, भाला यांसारख्या पारंपरिक युद्धकला नव्या पिढीपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांना योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली आहे.
पुणे महानगरपालिकेच्या महापौर चषक स्पर्धा शहरातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहेत. विविध पारंपरिक व आधुनिक क्रीडा प्रकारांमधून खेळाडूंना आपली कला सादर करण्याची संधी मिळते. यामध्ये शिवकालीन युद्धकलेचा समावेश झाल्यास युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आत्मविश्वास आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल, असे नगरसेविका रुपाली धाडवे यांनी सांगितले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाशी जोडलेली मर्दानी खेळांची परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. या कलेला प्रोत्साहन मिळाल्यास तरुण पिढीला आपल्या इतिहासाशी जोडण्याची आणि महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेची ओळख करून देण्याची संधी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, महापौर मंजुषाताई नागपुरे यांनी या मागणीचे स्वागत करत विषय सकारात्मक असून आपल्या मागणीचा योग्य तो विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे भविष्यात महापौर चषक स्पर्धेला पारंपरिक क्रीडा आणि सांस्कृतिक वारशाचीही जोड मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दीडशे वर्षांच्या मराठी साहित्यावर संशोधन

## प्रविण जोशी यांना पीएचडी

नीरा (दै. संध्या)

गुळुंचे (ता. पुरंदर) येथील प्रविण जोशी यांनी "प्रबोधन कालखंडाचा मराठी साहित्यावरील प्रभाव : कालखंड १८०० ते १९५०" या विषयावर सखोल संशोधन पूर्ण करून पीएचडी पदवी मिळवली आहे. तब्बल दीडशे वर्षांच्या मराठी साहित्यावर भारतीय तसेच इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स आणि रशिया येथील प्रबोधन चळवळींचा झालेला प्रभाव त्यांनी आपल्या संशोधनातून अभ्यासला आहे. या विषयावर यापूर्वी संशोधन झाले नसल्याने साहित्य क्षेत्रात हे मौलिक संशोधन मानले जात आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून त्यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

प्रविण जोशी हे ग्रामीण लेखक व कवी म्हणूनही ओळखले जातात. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अडीच वर्षांपूर्वी त्यांची बदली पाडेगाव येथील



शाळेत झाली. ग्रामस्थ व शाळा समितीच्या सहकार्याने त्यांनी शाळेचा कायापालट करत डिजिटल शाळा उभी केली. इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजिटल अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्याध्यापक बापूराव गायकवाड यांच्या सहकार्याने जोशी यांनी शाळेत कृतीवर्गाचा अभिनव उपक्रमही सुरू केला आहे.

नोकरी सांभाळत पहाटे चार-पाच वाजेपर्यंत संशोधनाचे काम त्यांनी अनेक महिने सुरू ठेवले. मराठीतील पहिले छापील पुस्तक ते पुढील दीडशे वर्षांतील वैचारिक व ललित साहित्याच्या हजारो संदर्भग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला. पाश्चात्य विचारवंत व त्यांच्या साहित्याचा प्रबोधन कालखंडातील बदलांवर झालेला परिणाम, विविध क्रांत्या आणि भारतीय प्रबोधनाच्या घटनांचा चिकित्सक आढावा त्यांनी संशोधनातून घेतला आहे.

वडगाव बुद्रुक येथील डॉ. वैजिनाथ राख यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. मौखिक परीक्षेसाठी बेळगाव येथील डॉ. चंद्रकांत वाघमारे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे होते. संशोधनासाठी डॉ. देविदास वायदंडे, डॉ. संदीप सांगळे, डॉ. सिद्धार्थ लांडे, डॉ. उमेश सिरसट आणि डॉ. कुंडलिक पारधी यांचे सहकार्य लाभल्याचे जोशी यांनी सांगितले.

"संशोधनाचा विस्तार मोठा असल्याने ते पूर्णत्वाला नेण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागली. नोकरी आणि कुटुंब सांभाळत हे संशोधन पूर्ण करता आले, याचा आनंद आहे. प्रबोधन विषयाशी संबंधित अनेक नव्या तथ्यांना या संशोधनातून पुष्टी मिळाली आहे," असे मत संशोधक डॉ. प्रविण जोशी यांनी व्यक्त केले.



## भोईटेवाडी शाळेत महिला दिन संपन्न

भोईटेवाडी (दै. संध्या)

भोईटेवाडी (तरडोली)- जि.प.प्राथमिक शाळा भोईटेवाडी येथे जागतिक महीला दिन उत्साहात संपन्न झाला. महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.शाळेत महिलांचा यथोचित सन्मान व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.महिलांनी मनोगत व्यक्त करून कार्यक्रम,खेळ सादर केले.स्पर्धेतील विजयी महिलांना पारितोषिक देण्यात आले.उपस्थित महिलांना अल्पोपाहार देवून सर्व महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी महिलांसह तरडोली गावच्या ग्रामसेविका रुपाली म्हेत्रे उपस्थित होत्या.शाळेचे मुख्याध्यापक रमेश चव्हाण,उपशिक्षिका रुक्मिणी चव्हाण यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## चोपडजमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

*चोपडज ग्रामपंचायतीच्यावतीने महिला विशेष ग्रामसभा आयोजन व महिलांचा सन्मान*

चोपडज (दै. संध्या)

चोपडज येथे 8 मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने ग्रामपंचायत चोपडज कार्यालयात महीला विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती.जागतिक महीला दिनाच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले,राजमाता जिजाई,राजमाता अहिल्यादेवी होळकर, इंदीरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन मनिषा भोसले सरपंच,दिपाली लडकत ग्रामविकास अधिकारी,लता चव्हाण अंगणवाडी सेविका,रेश्मा गाडेकर यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी मदतनीस पुजा गायकवाड,छाया लोणकर,कारंडे मॅडम,राणी जाधव,प्राथमिक आरोग्य केंद्र होळ




येथील कॉम्प्युटर ऑपरेटर वर्षाराणी शिंदे मॅडम,ग्रामपंचायत ऑपरेटर पार्वती शिंदे,लिपिक तुषार शिंदे व ग्रामस्थ सचिन गाडेकर उपस्थित होते.मा. उपसरपंच ग्रामपंचायत चोपडज,अध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा बारामती, तालुका भाजपा उमेश गायकवाड यांनी गावातील महिलांना बालसंगोपन, विविध प्रकारच्या शासकीय योजनांची महीला बचत गटांना माहिती दिली. महीला बचत गटांना प्रोत्साहन कर्ज योजना, स्वयंरोजगारासाठी कर्ज, तसेच विविध प्रकारचे प्रशिक्षण अनुलोम संस्थेच्या माध्यमातून मोफत दिले जाईल असे सांगितले. महीला सक्षमीकरण करण्यासाठी ग्रामपंचायत चोपडज मार्फत प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन सरपंच मनिषा भोसले व ग्रामविकास अधिकारी दिपाली लडकत यांनी दिले.चोपडज गावातील महिलांना शुभेच्छा देण्यात आल्या व सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

## पुणे शहर व जिल्ह्यातील बेकायदेशीर पानटपऱ्यांवर कारवाईची मागणी

*अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये नशेचे प्रमाण वाढण्याची भीती – चंद्रकांत वारघडे*

कोरेगावमुळ (दै. संध्या)

पुणे शहर तसेच जिल्ह्यातील रस्ते, हायवे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पानटपऱ्यांद्वारे नशिले पान, तंबाखूजन्य व आरोग्यास अपायकारक पदार्थांची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकारामुळे विशेषतः शालेय व महाविद्यालयीन अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये नशेच्या पदार्थांचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण झाल्याची चिंता सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गोविंद वारघडे यांनी व्यक्त केली आहे.

या संदर्भात वारघडे यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक, पुणे शहराचे पोलीस आयुक्त, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, झोन क्रमांक ७ चे



पोलीस उपायुक्त तसेच वाघोली व लोणिकंद पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि अन्न व औषध प्रशासन विभाग यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, अनेक ठिकाणी विना परवाना पानटपऱ्यांद्वारे तंबाखूजन्य पदार्थांची विक्री सुरू असून हे सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थ (COTPA) अधिनियम २००३, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ तसेच भारतीय दंड संहिता कलम २६८, २६९ व २७० यांचे उल्लंघन असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी असतानाही अनेक ठिकाणी सर्रास विक्री होत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे शहर व जिल्ह्यातील सर्व बेकायदेशीर पानटपऱ्यांवर पोलीस प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्त तपासणी मोहीम राबवून कठोर कारवाई करावी, तसेच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात विशेष मोहीम राबवून अल्पवयीन विद्यार्थ्यांना नशेच्या पदार्थांपासून संरक्षण द्यावे, अशी मागणी वारघडे यांनी केली आहे.

या गंभीर सामाजिक प्रश्नाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कठोर पावले उचलावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

## दहिवडीत बक्षीस वितरण, स्नेहसंमेलन उत्साहात

दहिवडी (दै. संध्या)

दहिवडी येथील परशुराम महादेव शिंदे कन्या विद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण व स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींना प्रोत्साहन मिळावे व सुप्त कलागुणांना वाव मिळावा, यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वराज करिअर ॲकॅडमीचे संस्थापक सुनील काटकर, महिमानगड फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश गोडसे, रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर प्रा. अनिल दडस, माजी मुख्याध्यापिका रेखा पवार आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयातील २१० विद्यार्थिनींना चषक, शालोपयोगी साहित्य देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कला महोत्सवात नृत्य, गीत गायन, नाटिका आदी एकूण ३६ कलाविष्कारांचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. यात विद्यालयातील १४२ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थिनींच्या कलागुणांना उपस्थित मान्यवर व पालकांनी भरभरून दाद दिली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता काटकर यांनी प्रास्ताविक केले. राणी आसबे व अर्चना खैरे यांनी सूत्रसंचालन केले. सुनील वसव यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक औदुंबर हंबीरे, उपशिक्षिका रंजना पोळ व हेमलता बंडगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डिजिटल लायजेशियनमध्ये कांदा व बटाटा विभागाचे कामकाज



चाकण (दै. संध्या)

जगाच्या पाठीवर भक्कम होत चाललेल्या तंत्रज्ञानाच्या जोरावर खेड कृषी उत्पन्न बाजार समितीनेही मोठी झेप घेतली असून, चाकण येथील महात्मा फुले उपबाजारातील कांदा - बटाटा विभागातील कामकाज आता डिजिटल लायजेशियन मध्ये सुरू करण्यात आले आहे. खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचा चाकण येथील उपबाजार संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. या बाजारात महिन्यातील दर शनिवारी व बुधवारी कांदा व बटाट्याची मोठ्या प्रमाणात आवक होते. विक्रेते आपला कांदा व बटाटा विक्रीसाठी येथे आणतात. संभाव्य घटना टाळण्यासाठी बाजार समितीने बाजार परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. बाजार समितीतील महत्त्वाचे कामकाज, व्यवहार सुरळीत आणि पारदर्शक व्हावे, यासाठी बाजार समितीने ठोस पाऊल उचलले आहे. मार्केटमध्ये लायसन्स व कांदा आणि बटाटा विभागाचे कामकाज डिजिटल लायजेशियन मध्ये सुरू करून शेतकरी व व्यापारी यांच्यामध्ये दुवा साधण्याचा प्रयत्न केला आहे. खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य विजयसिंह शिंदे पाटील, उपसभापती क्रांती सोमवंशी, प्रभारी सचिव बाळासाहेब धंद्रे व सहसचिव संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू करण्यात आले आहे. लायसन्स विभाग प्रमुख विलास कड व कांदा, बटाटा विभाग प्रमुख बाबुराव सांडभोर यांनी ही माहिती दिली. कड यांनी सांगितले की," डिजिटल लायजेशियनमुळे कामाचा वेग प्रचंड वाढला आहे. वेळ, श्रम व साधनांचा आता अपव्यय होत नाही. बाजार समितीच्या महत्त्वाच्या कामकाजात डिजिटल लायजेशियनची नितांत गरज होती. बाजार समितीने ही गरज ओळखून हे तंत्रज्ञान तातडीने विकसित केले आहे."

## जुन्नर न्यायालयात मोफत ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी शिबिर संपन्न; ५७ महिलांची चाचणी

जुन्नर (दै. संध्या)

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि तालुका वकील संघ, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर न्यायालयात महिला वकील, पोलीस कर्मचारी आणि पक्षकार महिलांसाठी 'आस्था' ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ५७ महिलांची अत्याधुनिक तंत्रज्ञानाने तपासणी करण्यात आली.

शिबिरादरम्यान मार्गदर्शन करताना डॉ. प्रिया करडीले यांनी महिलांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, "ग्रामीण भागातील महिला अनेकदा लाजपोटी किंवा आर्थिक परिस्थितीमुळे आजार अंगावर काढतात. स्तनाचा कर्करोग जर पहिल्या किंवा दुसऱ्या टप्प्यात लक्षात आला, तर रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र, तिसऱ्या टप्प्यात हा आजार जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे वेळेत तपासणी करणे आवश्यक आहे."

तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. शीतल शिंदे यांनी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबद्दल माहिती




दिली. कुटुंबातील १४ वर्षांच्या मुलींना HPV लस टोचून घेणे भविष्यातील धोके टाळण्यासाठी कसे गरजेचे आहे, हे त्यांनी पटवून दिले. विशेष म्हणजे, ही लस प्राथमिक आरोग्य केंद्रात विनामूल्य उपलब्ध असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांत ४,००० पेक्षा जास्त महिलांची ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी करण्यात आली असून, सुमारे २० गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया देखील करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हा सत्र न्यायाधीश मा. श्री. एस. बी. शेलार, वरिष्ठ न्यायाधीश मा. हुसेन साहेब, न्यायाधीश मा. श्रेया जैन मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. हेमंत हडवळे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, डॉ. दयानंद गायकवाड, डॉ. प्रियांका बोरा, तपासणी तज्ज्ञ सपना बेलवटे, उज्वला गवळी व इतर मान्यवर उपस्थित होते.

विशेष उपक्रम: उपस्थित सर्व महिलांना आरोग्यविषयक जनजागृतीपर 'कळी उमलताना' या पुस्तकाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन: ॲडव्होकेट शमीन इनामदार व तृप्ती परदेशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

आभार प्रदर्शन: वकील संघाच्या उपाध्यक्षा ॲड. नीलिमा शेरकर यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लोकनेते बाळासाहेब देसाई यांना मुख्यमंत्र्यांकडून अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला मेघदूत निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आदी यांनीही लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

### आजपासून नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती : प्रताप सरनाईक



मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आजपासून म्हणजेच 9 मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाणार असून, त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे माहिती मंत्री सरनाईक यांनी सांगितले. मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील 5 लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असून शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य शासनाला याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्यास सांगितले आहे. महाराष्ट्राचे परिवहन मंत्री या नात्याने केंद्र शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहारानंतर केंद्राने कार्यालयीन स्मरणपत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, 2019 अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 67 (3) नुसार राज्य शासनाला प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येईल, असे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे.

### भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाने देशभरात जल्लोष : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई (दैनिक संध्या) : टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अहमदाबाद येथे भारतीय क्रिकेट संघाने ऐतिहासिक विजय मिळविल्यामुळे देशभरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजयाने क्रिकेट विश्वात भारताचा गौरव उंचावला आहे. भारतीय संघाने दाखवलेल्या जिद्द, आत्मविश्वास आणि उत्कृष्ट सांघिक खेळामुळे पुन्हा एकदा क्रिकेट जगतात देशाचा अलौकिक गौरव झाला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. त्यावेळी ते बोलत होते. या देदिप्यमान यशाबद्दल भारतीय क्रिकेट संघ, प्रशिक्षक मंडळ तसेच बीसीसीआयचे चेअरमन जय शाह यांचे राज्यशासन आणि राज्यातील जनतेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करत भारतीय संघाची विजयी पताका अशीच उंचावत राहो, अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईतील वानखेडे स्टेडियम येथे झालेल्या उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यानंतर अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत विश्वचषक जिंकला. या विजयासह सलग दोन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला असून भारताने २००७, २०२४ आणि २०२६ अशा तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा मान मिळवला आहे. हा केवळ क्रिकेटमधील विजय नसून भारतीय खेळाडूंच्या जिद्दीचा, संघभावनेचा आणि विश्वासाचा प्रतीक असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले. भारतीय संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार सूर्यकुमार यादव, फलंदाज संजू सॅम्सन, तसेच गोलंदाज जसप्रीत बूमरा यांच्यासह संपूर्ण संघाचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. अंतिम सामन्यात भारतीय गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी करत न्यूझीलंडला पराभूत केले, तर संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे दर्शन घडवले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# मुलींच्या आरोग्य संरक्षणासाठी महिला 'एचपीव्ही लसीकरण मोहीम' सुरू

## १४ वर्षांच्या मुलींसाठी महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये मोफत लसीकरण

पिंपरी (दै. संध्या)



आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकारतर्फे महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २८ फेब्रुवारी २०२६ रोजी देशव्यापी एचपीव्ही लसीकरण कार्यक्रम सुरू झाला आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत नवीन सांगवी रुग्णालयात सदर मोहिमेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये २४ लाभार्थ्यांनी या लसीकरणाचा लाभ घेतला. महापौर रवी लांडगे व आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या मोहिमेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये १४ वर्षे पूर्ण पण १५ वर्षांखालील मुलींसाठी एचपीव्ही लस मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मोहीम ही पुढील ३ महिने चालणार आहे.

HPV ही लस सुरक्षित, प्रमाणित आणि वैज्ञानिकदृष्ट्या प्रभावी असल्याने पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण वेळेत करून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून करण्यात आले आहे. भारत सरकारच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार १४ वर्षांच्या मुली (ज्यांनी १४ वा वाढदिवस साजरा केला आहे पण १५ वर्षे पूर्ण झालेली नाहीत) या एचपीव्ही लसीसाठी पात्र आहेत. जगभरात एचपीव्ही लसीचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे, सध्या या वयोगटावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, जेणेकरून १५ वर्षांच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलींना वेळेत संरक्षण मिळू शकेल. सर्व मनपा रुग्णालयामध्ये सकाळी ९.३० ते दुपारी २ पर्यंत मोफत लसीकरण सत्र सुरु राहतील.

नागरिकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेद्वारे संचलित यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पिंपरी; तालेरा रुग्णालय, चिंचवड; नवीन भोसरी रुग्णालय, भोसरी; इंदिरा गांधी प्रसूती गृह, सांगवी रुग्णालय, सांगवी; नवीन थेरगाव रुग्णालय, थेरगाव; जिजामाता रुग्णालय, पिंपरी तसेच कै.ह.भ.प. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी, यमुनानगर रुग्णालय, यमुनानगर येथे संपर्क साधून मोफत एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा.

तसेच लस घ्यायला येताना आधार, शाळेचे ओळखपत्र (I card ) तत्सम ओळख पत्र घेऊन आणि भरपेट नाश्ता करून पालकांनी मुलींना घेऊन यावे, असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने केले आहे.

"महिलांच्या आरोग्याचे संरक्षण ही महापालिकेची महत्त्वाची जबाबदारी आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी एचपीव्ही लसीकरण हा प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील १४ वर्षांच्या मुलींसाठी ही लस मोफत उपलब्ध करून देत आहे. पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींचे लसीकरण करून या आरोग्य उपक्रमाला प्रतिसाद द्यावा."
**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### लसीकरणासाठी अपात्र परिस्थिती..

खालील परिस्थितींमध्ये एचपीव्ही लसीकरण दिले जाणार नाही किंवा पुढे ढकलले जाईल,
१४ वर्षांच्या लक्ष्य वयोगटाबाहेरील मुली
पूर्वी एचपीव्ही लस (गार्डासिल किंवा सर्वाव्हॅक) घेतलेली असल्यास
लस किंवा तिच्या घटकांमुळे (यीस्ट) तीव्र ऍलर्जीचा इतिहास असल्यास
मध्यम ते गंभीर आजार असल्यास – पूर्णपणे बरे झाल्यानंतरच लसीकरण करावे.

"महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एचपीव्ही संक्रमण हे गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण असून, योग्य वयात दिलेली एचपीव्ही लस हा त्याविरुद्धचा प्रभावी उपाय आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील मुलींच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी ही मोफत लसीकरण मोहीम राबवत आहे."
**– श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

"एचपीव्ही व्हायरस हा गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा मुख्य कारणीभूत घटक आहे. योग्य वयात म्हणजे १५ वर्षांपूर्वी दिलेली एचपीव्ही लस मुलींना दीर्घकालीन संरक्षण देते. त्यामुळे पालकांनी १४ वर्षांच्या मुलींचे लसीकरण वेळेत करून घेणे अत्यंत आवश्यक आहे."
**– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

## तालुका क्रीडा संकुलाच्या सुधारित आराखड्यास मान्यता

मुंबई (दै. संध्या)

सिंदेवाही (जि. चंद्रपूर) तालुका क्रीडा संकुलात आवश्यक क्रीडा सुविधा वाढविण्यावर भर दिला जात आहे. राज्य क्रीडा विकास समितीमार्फत या क्रीडा संकुलाच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य अभिजित वंजारी यांनी सिंदेवाही (जि. चंद्रपूर) तालुका क्रीडा संकुलातील सुविधांबाबत विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सदाभाऊ खोत, भाई जगताप, प्रवीण दरेकर आणि अमोल मिटकरी यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, या क्रीडा संकुलासाठी एक कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. तर सुधारित आराखडा व अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या क्रीडा संकुलात हॉकी ॲस्ट्रोटर्फ व ४०० मीटर धावनमार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. हे क्रीडा संकुल शहरातील बसस्थानकापासून अडीच किलोमीटर आणि रेल्वे स्थानकापासून दीड किलोमीटरवर असून संकुलापर्यंत डांबरी रस्ताही उपलब्ध आहे. त्यामुळे खेळाडू आणि क्रीडाप्रेमींना येथे येण्यासाठी कोणतीही गैरसोय नसल्याचे त्यांनी सांगितले. या क्रीडा संकुलासाठी आवश्यक नवीन सुविधा दिल्या जातील असे सांगत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, या क्रीडा संकुल संदर्भात सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर सर्व सदस्यांची बैठक घेतली जाईल.

## पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करा

### महापौर रवि लांडगे यांच्या संबधित अधिकाऱ्यांना सूचना

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक कानाकोपऱ्यात नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रभागांमधील स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळकटी देत अतिक्रमणांवर प्रभावी कारवाई करणे, कचरा संकलन, नालेसफाई तसेच रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय वाढवून नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत अतिक्रमण, कचरा संकलन, रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची नियमित साफसफाई, नालेसफाई तसेच स्वच्छतेसंबंधित आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन निगडी येथील अ क्षेत्रीय कार्यालय येथे करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. पिंपरी चिंचवड शहरातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यावर विशेष भर देण्यात आला. शहरातील अतिक्रमण, कचरा संकलन, रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची नियमित साफसफाई, नालेसफाई तसेच स्वच्छतेसंबंधित कामे अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश महापौर रवी लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सभापती कैलास कुटे, माजी उप महापौर शैलजा मोरे, नगरसदस्य मंदार देशपांडे, कुशाग्र कदम, नगरसदस्या सुप्रिया चांदगुडे,सविता आसवानी, अरुणा लंगोटे, वैशाली काळभोर, अनुराधा गोरखे तसेच आरोग्य विभागाचे उपआयुक्त प्रदीप ठेंगल, प्रशासन अधिकारी प्रिया गोरखे, कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण) सुनील पवार, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, योगेश आल्हाट लक्ष्मीकांत कोल्हे, महेश बरीदे, वैशाली ननवरे, दिलीप भोसले, सोहन निकम, सचिन लोणे, उमेश बाकले, अमोल धडस, ऋषिकेश सामंत, किरण फड, सहाय्यक आरोग्य अधिकारी, उपअभियंते, कनिष्ठ अभियंते तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## *पिंपरी-चिंचवडमध्ये प्रदूषण नियंत्रणासाठी आरएमसी प्लांटवर मनपाचे निर्बंध; नियम न पाळणाऱ्यांवर कारवाई*

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेने कठोर पावले उचलली असून आरएमसी (Ready Mix Concrete) प्लांट आणि बांधकाम साहित्य पुरवठादारांवर कडक निर्बंध लागू केले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या उपाययोजना पूर्ण न करणाऱ्या आरएमसी प्लांटना तात्काळ बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत शहरातील हवा स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शहरातील वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी वायू गुणवत्ता सूचकांक (AQI) मोजणी केंद्रे, फॉग कॅनॉन वाहने, रोड वॉशर वाहने आणि मिस्ट फाउंटन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच सुरू असलेल्या बांधकामे, आरएमसी प्लांट आणि क्रशर आस्थापनांवर देखरेख ठेवण्यासाठी उपद्रव शोध पथकाची नियुक्ती करण्यात आली असून या पथकाकडून नियमित तपासणी केली जात आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरएमसी प्लांट आणि बांधकाम स्थळांवर धूळ व वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक ठिकाणी या सूचनांचे पालन होत नसल्याचे मनपाच्या निदर्शनास आले आहे.

दरम्यान, शहरातील AQI मोजणी केंद्रांच्या नोंदींनुसार हवेची गुणवत्ता सध्या 'मध्यम' (AQI १०० ते १५०) या श्रेणीत असल्याचे दिसून आले आहे. तसेच नागरिकांकडून श्वसनाच्या तक्रारी वाढत असल्याची माहितीही महानगरपालिकेला प्राप्त झाली आहे.

या पार्श्वभूमीवर मनपाने स्पष्ट केले आहे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या सर्व उपाययोजना पूर्ण केल्यानंतरच आरएमसी प्लांट सुरू ठेवण्यास परवानगी दिली जाईल. ज्या ठिकाणी नियमांचे पालन करण्यात आले आहे, त्यांनाच काम सुरू ठेवण्याची मुभा असेल.

तसेच मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयातील बीट निरीक्षकांमार्फत आरएमसी प्लांटची दैनंदिन तपासणी केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येणार आहे. गरज भासल्यास संबंधित आस्थापना सील करण्याची कारवाईही केली जाईल, असा इशारा महानगरपालिकेने दिला आहे.

महानगरपालिकेने सर्व आरएमसी प्लांट धारक आणि बांधकाम साहित्य पुरवठादारांना आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाययोजना तातडीने राबवूनच आस्थापना सुरू ठेवाव्यात, असे आवाहन केले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# महिलांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागानेच सशक्त महाराष्ट्र घडेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महिला व बालविकास विभागाचा सक्षम महिला-सशक्त महाराष्ट्र कार्यक्रम

मुंबई (दै. संध्या)




शिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाव्दारे राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होईल. आर्थिकदृट्या सक्षम महिलांच्या अर्थव्यवस्थेतील सहभागानेच सशक्त महाराष्ट्र घडविता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महिला व बालविकास विभागाच्यावतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'सक्षम महिला-सशक्त महाराष्ट्र' या विशेष कार्यक्रमात प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सक्षमपणे उभ्या राहिलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुरस्कारप्राप्त महिलांचे अभिनंदन करत त्या इतर महिलांसाठी प्रेरणा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त नयना गुंडे, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वि. रा. ठाकूर, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवाडे, उपायुक्त जमसिंग गिरासे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेत अनेक महिलांनी प्रगती साध्य केली आहे. अशाच प्रतिकुल परिस्थितीवर मात करत यशस्वी ठरलेल्या जळगाव येथील वैशाली हिवराळे, नाशिक येथील सेजल जडेजा, कुर्ला (मुंबई) येथील सरिता नाईक, परभणी येथील सुरेखा पवार, पुणे येथील

बागेश्वरी रेड्डी, रायगड जिल्ह्यात नोकरी करणाऱ्या बीड येथील ज्योती मीरगणे, मुंबईत नोकरी करणाऱ्या पुणे येथील सुवर्णा अग्रवाल, पूणे येथील मार्जेना दिलावर मणेर आणि मानसी पटेकर, तसेच किरण पांडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जीवनाचा मार्ग प्रशस्त करणाऱ्या या महिला समाजातील अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत. हा केवळ सत्कार नसून त्यांच्या जीवनाचा सन्मान सोहळा आहे. विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना रोजगार, शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य देण्याचे काम शासन करीत आहे. या प्रक्रियेतून महिला सक्षम बनणार असून, रोजगार, उद्योग आणि आर्थिक सक्षमीकरणातून महिलांचा राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत सहभाग वाढणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळणार असून, सशक्त राष्ट्र घडविण्याची ही प्रक्रिया आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विकसित भारत २०४७ लक्ष्य गाठायचे असल्यास महिलांचा अर्थव्यवस्थेत सहभाग असणे आवश्यक आहे, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भूमिका आहे. केंद्र सरकारने 'बेटी बचाव बेटी पढाव', 'लखपती दीदी' सारख्या अनेक योजना राबवून महिलांना प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध करून दिली आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ हे लक्ष्य गाठण्यासाठी राज्यातही महिलांना आर्थिक बळ देऊन त्यांचा मानव संसाधन म्हणून अर्थव्यवस्थेत सहभाग करून घेण्यासाठी शासन कृतिशील आहे. विकसित राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढविल्यामुळे अर्थव्यवस्था मजबूत झाली, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दोन वर्षांत राज्यात ३७ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले असून दरवर्षी एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या महिलांची संख्या २०२६–२७ मध्ये एक कोटीपर्यंत नेण्याचा शासनाचा मानस आहे. यामुळे अर्थचक्र परिवर्तीत होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्ष महिला शेतकरी वर्ष घोषित केल्याचा संदर्भ देत महिला शेतकरी, पशुपालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालकांना सहाय करणाऱ्या योजना राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, शासन महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे. महिलांचा सन्मान म्हणजे केवळ गौरवाचे शब्द नसून त्यांच्या भावना, अपेक्षा आणि स्वप्नांचा खरा आदर करणे होय. शेतीपासून विज्ञानापर्यंत विविध क्षेत्रांत महाराष्ट्रातील महिलांनी उल्लेखनीय कर्तृत्व गाजवले असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे निर्णयप्रक्रियेत महिलांना समान स्थान आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होय. असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या.

राज्यातील तसेच केंद्र शासनातील विविध योजनांचा लाभ एकल महिलांना मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. एकल महिलांसाठी धोरण ठरविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आर्थिकरित्या त्यांना सक्षम करून उद्योग व व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यात योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये मनोधैर्य योजना, वन स्टॉप सेंटर, सखी सेंटर आणि शक्ती सदन यासारख्या योजनांची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचेही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## दरवाजाबाहेर ठेवलेल्या चावीच्या सहाय्याने घरफोडी, सीसीटीव्ही फुटेजची पाहणी

पिंपरी (दैनिक संध्या) : गावी जाताना दरवाजाला कुलूप लावून बाहेर चावी ठेवणाऱ्या नागरिकांवर लक्ष ठेऊन एका महिलेने सांगवी येथे दोन घरफोड्या केल्या. गुन्हे शाखा युनिट एकने सांगवी ते वारजे माळवाडी पर्यंत सुमारे २५० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत आरोपी महिलेची ओळख पटवली. त्यानंतर तिला अटक करत तिच्याकडून आठ लाख रुपये किमतीचे दागिने जप्त केले. सुमन दत्ता लोंढे ( वय ३५, रा. अचानक चौक, रामनगर वारजे माळवाडी पुणे) असे अटक केलेल्या आरोपी महिलेचे नाव आहे. सांगवी पोलीस ठाण्यात २५ फेब्रुवारी रोजी घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट एकने केला. पथकाने सांगवी ते वारजे माळवाडी दरम्यान सुमारे २५० सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये एक महिला चोरी करत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी महिलेची माहिती घेत तिला अटक केली. पोलीस कोठडीदरम्यान तिच्याकडे तपास करत तिच्याकडून आठ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले. महिलेने मागील वर्षी सांगवी येथे आणखी एक घरफोडी केल्याचे सांगितले. नागरिक घरातून बाहेर जाताना घराला कुलूप लावतात, मात्र चावी दरवाजाच्या बाहेर कुठेतरी लपवून ठेवतात. चावी लपवून ठेवणाऱ्या नागरिकांवर आरोपी महिला पाळत ठेवत असे. त्यानंतर संधी साधून तिने या चोऱ्या केल्या होत्या. महिलेला सांगवी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे, सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुळीग, उपनिरीक्षक कर्मराज गावडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक संतोष इंगळे, पोलीस कॉन्स्टेबल उषा दळे, महादेव जावळे, शिवराम भोपे, अजय डगळे, जयवंत राऊत, देवा राऊत, विजय शेळकंदे, तेजस भालचिम, संदेश देशमुख, विजय जानराव यांनी केली आहे.

## शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली ज्येष्ठाची दोन कोटींची फसवणूक

पिंपरी (दैनिक संध्या) : शेअर बाजार आणि आयपीओमध्ये गुंतवणुकीवर मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची दोन कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना २ फेब्रुवारी ते ७ मार्च २०२६ दरम्यान ऑनलाईन माध्यमातून घडली.या प्रकरणात एका तरुणाने आपल्या वडिलांच्या वतीने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी एका महिलेसह चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीच्या वडिलांना एका व्हॉट्सअप ग्रुपमध्ये सामील केले होते. त्यांना १० ते १५ टक्के नफ्याचे आमिष दाखवून एका लिंकद्वारे ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्यानंतर वेगवेगळ्या शेअर्स आणि आयपीओमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली एकूण २ कोटी ९ लाख ३० हजार ५३७ रुपये विविध बँक खात्यात भरण्यास लावले. ॲपवर खोटा नफा दाखवून प्रत्यक्षात त्यांची फसवणूक करण्यात आली. सायबर पोलीस तपास करत आहेत.

## व्हॉट्सअप ग्रुपद्वारे ट्रेडिंगचे आमिष दाखवून 30 लाखांचा गंडा

पिंपरी (दैनिक संध्या) : जादा नफ्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीला ट्रेडिंग ॲप डाऊनलोड करायला लावून त्यांची ३० लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना २३ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत चिखली येथील राजे शिवाजी नगर येथे घडली.या प्रकरणात एका व्यक्तीने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी एका महिला आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीला एका व्हॉट्सअप ग्रुपमध्ये सामील करण्यात आले होते. तेथील महिला ॲडमीनने त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना एक ट्रेडिंग ॲप इन्स्टॉल करण्यास सांगितले. त्यानंतर वेळोवेळी वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण ३० लाख ५० हजार रुपये भरण्यास भाग पाडले. गुंतवलेले पैसे परत न देता त्यांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. चिखली पोलीस तपास करत आहेत.

## लोन ॲपच्या माध्यमातून तरुणाला धमकावून पैसे उकळले; मुंढवा पोलिसांकडून गुन्हा

पुणे (दैनिक संध्या) : लोन ॲपच्या माध्यमातून तरुणाची बदनामी करण्याची धमकी देऊन चोरट्यांनी त्याच्याकडून पैसे उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध मुंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका २९ वर्षीय तरुणाने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणाच्या मोबाइल क्रमांकावर जानेवारी महिन्यात चोरट्यांनी संपर्क साधला. तरुणाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधणाऱ्या चोरट्यांनी आंतरराष्ट्रीय मोबाइल क्रमांकाचा वापर केला होता. आरोपींनी त्याला लोन ॲपवरुन काढलेल्या कर्जाचे पैसे भरण्यास सांगितले. त्यानंतर तरुणाने चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा केले. चोरट्यांनी तरुणाच्या छायाचित्रात तांत्रिक फेरफार करुन समाज माध्यमात प्रसारित करण्याची धमकी दिली होती. हे छायाचित्र परिचितांना पाठविण्यात येईल, असे सांगून त्याच्याकडून पैसे उकळले, असे तरुणाने फिर्यादीत म्हटले आहे.

## ऑनलाइन टास्क'च्या आमिषाने तरुणाची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी (ऑनलाइन टास्क) असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एका तरुणाची पावणेसहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध मांजरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका तरुणाने मांजरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३८ वर्षीय तरुण मांजरी भागात राहायला आहे. सायबर चोरट्यांनी तरुणाच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला. घरातून ऑनलाइन पद्धतीने काम केल्यास चांगले पैसे मिळतील. एका हॉटेलला दर्शक पसंती (व्ह्यूज) मिळवून द्यायची आहे, असे आमिष दाखवून चोरट्यांनी त्याला जाळ्यात ओढले. त्यानंतर चोरट्यांनी त्याला पैसे गुंतविण्यास सांगितले. गेल्या महिनाभरात चोरट्यांच्या खात्यात तरुणाने पाच लाख ७५ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर जास्त परतावा मिळेल, असे सांगण्यात आले होते. तरुणाने चोरट्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा मोबाइल क्रमांक बंद असल्याचे दिसून आले.

# कर्तृत्ववान महिलांचा सासवड पोलिस व पत्रकारांकडून सन्मान

**सासवड (दै. संध्या)**



सध्या अनेक ठिकाणी अत्याचाराच्या घटना ऐकण्यात येतात त्याला पुरुषांप्रमाणे स्त्रियाही काही अंशी जबाबदार आहेत, कुटुंबात महिलेने समजून घेतले तर वाद होणार नाहीत असे आवाहन पुरंदरच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्री श्रीमाळ यांनी केले आहे. सासवड पोलिस स्टेशन येथे पोलिस व शहर पत्रकार संघाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिन निमित्ताने आयोजित महिला सन्मान सोहळा कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पोलिस निरीक्षक कुमार कदम, पोलिस उपनिरीक्षक अर्चना पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.सोबतच्या महिलेला आपण त्या जागी स्वतः आहोत अशी वागणूक द्या किमान तशी अपेक्षा ठेवा असेही श्री श्रीमाळ यांनी स्पष्ट केले . सासवड पोलिस स्टेशन व पत्रकार संघ सासवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील पाच कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. सासवड एस टी स्टँड परिसरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या छाया सुभाष पवार, शेतकरी असूनही दोन्ही मुलांना पोलिस खात्यात दाखल करणाऱ्या उदाचीवाडी येथील वैशाली तानाजी हगवणे, संगीत क्षेत्रात विशेष काम करणाऱ्या सुवर्णा भगवान होले (नाळे) , अगदी कमी कालावधीत वैधव्य प्राप्त झाले असूनही चार मुलांना उच्च विभूषित करणाऱ्या परवीन मुसाभाई बागवान व सासवड पोलिस स्टेशन येथे वाहन चालक म्हणून कार्यरत असलेल्या रुपाली गंगाधर पुंडगे (वाढवे) यांना या प्रसंगी सन्मानपत्र आणि साडीचोळी देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सुवर्णा होले, छाया पवार तसेच परवीन बागवान यांच्या वतीने त्यांची नात आयात बागवान यांनी सत्काराला. मनोगतातून उत्तरे दिली. पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी या उपक्रमाचे कौतुक करत पुरस्कारार्थींची संख्या अजून वाढवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. सर्व पुरस्कार प्राप्त महिलांचे कौतुक करत त्यांना कदम यांनी प्रोत्साहित केले. किशोरी अतुल पवार यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले यांनी सूत्र संचालन केले.बाळासाहेब कुलकर्णी यांनी प्रास्तविक केले तर संभाजी महामुनी यांनी आभार मानले. ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार, प्राचार्य इस्माईल सय्यद, संतोष जगताप, नगरसेवक माऊली गिरमे, डॉ संदीप होले, मोहन चव्हाण, अविनाश निगडे, हनुमंत मेमाणे, प्रा संदीप टिळेकर, केशव काकडे, हरून बागवान, भालचंद्र बुधकर ॲड भगवान होले, अशपाक बागवान, कलाताई फडतरे कुमुदिनी पांढरे यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

सुधीर गुरव, गणेश मुळीक, जीवन कड राजेंद्र बर्गे, नितीन यादव, गौरव कोलते, तानाजी सातव, संदीप जगताप, जगदीश शिंदे या पत्रकार मंडळीबरोबरच पोलिस स्टेशनचे रुपेश भगत आदींनी या सोहळ्याचे सुंदर नियोजन केले.



## शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवड विषयक प्रशिक्षण

**फलटण (दै. संध्या)**

फलटण येथील श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय व कृषी महाविद्यालयात वनराई प्रकल्प, पुणे व एशियन पेंट्स, खंडाळा यांच्या वतीने खंडाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवडविषयक प्रशिक्षण व अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणात हरिपूर, अंबरवडी, अजनोज, पाडळी व बोरी येथील एकूण ५० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला फळबाग लागवड प्रशिक्षक प्रा. ए. डी. पाटील, उद्यानविद्या विभागाचे प्रा. एन. ए. जाधव व प्रा. ए. ए. शिंदे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, तसेच श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. निंबाळकर आणि कृषी महाविद्यालय, फलटणचे प्राचार्य डॉ. यु. डी. चव्हाण यांनी शेतकरी व मार्गदर्शकांचे स्वागत केले.

प्रा. ए. डी. पाटील यांनी आंबा, पेरू व अंजीर या फळपिकांची आधुनिक पद्धतीने लागवड करून उत्पादनवाढ कशी साध्य करता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. योग्य वाणांची निवड, रोपांची लागवड पद्धत, अंतर व्यवस्थापन, खत व पाणी व्यवस्थापन तसेच रोग व कीड नियंत्रण याविषयी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उद्यानविद्या विभागाचे प्रा. एन. ए. जाधव यांनी फळबाग रोपवाटिका व्यवस्थापन व रोपांची निगा राखण्याच्या पद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

## विद्यापीठ चौकातील दुहेरी उड्डाणपुलाच्या बांधकामावर प्रश्न

### पीएमआरडीएकडून तात्काळ तपासणीची मागणी

**पुणे (दै. संध्या)**



पुणे विद्यापीठ चौकात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येत असलेल्या दुहेरी उड्डाणपुलाच्या बाणेरकडील चढावाचे उद्‌घाटन नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पार पडले. मात्र या उड्डाणपुलाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करत माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत.

निम्हण यांनी सामाजिक माध्यमांवर उड्डाणपुलाच्या एका भागाचे छायाचित्र प्रसिद्ध करत त्या ठिकाणी बांधकामातील त्रुटी स्पष्टपणे दिसत असल्याचा दावा केला आहे. या उड्डाणपुलाला स्वर्गीय अजित पवार यांचे नाव देण्याचा विचार सुरू असताना अशा प्रकारचे दोष दिसणे हा मोठा विरोधाभास असल्याची टीका त्यांनी केली.

निम्हण यांनी सांगितले की, याच ठिकाणी पूर्वी असलेला उड्डाणपूल चुकीच्या पद्धतीने बांधला गेल्याने तो पाडण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्या निर्णयावर त्यावेळी टीका झाली होती; मात्र पुणेकरांच्या हितासाठी आणि भविष्यातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दुहेरी उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा महत्त्वाच्या प्रकल्पात घाईघाईने उद्‌घाटन करून बांधकामातील दोषांकडे दुर्लक्ष करणे गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. आपले शिक्षण स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये झाल्याचे सांगत निम्हण म्हणाले की, मेट्रो मार्गावरील उंच पूल सामान्यतः ताण दिलेल्या संरचनेच्या पद्धतीने बांधले जातात. अशा रचनेमध्ये आत ताण दिलेल्या लोखंडी तारांचा वापर असतो आणि त्या मुख्य भार पेलतात. त्यामुळे बाहेर दिसणाऱ्या त्रुटींमुळे लगेच पूल कोसळेल असे नसले तरी छायाचित्रावरून जोडणी व्यवस्थित झालेली नसल्याचे दिसते आणि बांधकामाच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे दीर्घकाळ टिकण्यावर परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

मुंबईत अशाच प्रकारच्या त्रुटींमुळे अपघात झाल्याचे उदाहरण देत पुण्यात अशी घटना घडू नये, यासाठी या उड्डाणपुलाची तातडीने सखोल तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पुणे शहराचा वेगाने विकास व्हावा आणि ते जागतिक स्तरावरील क्षमता केंद्र म्हणून विकसित व्हावे, अशी शासनाची भूमिका आहे. त्यासाठी रस्ते व इतर मूलभूत सुविधांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र अशा महत्त्वाच्या प्रकल्पांमध्येच प्रशासनाकडून निष्काळजीपणा होत असेल, तर विकासाच्या उद्दिष्टाला धक्का बसू शकतो, अशी चिंता निम्हण यांनी व्यक्त केली.

मी सत्ताधारी पक्षाचा कार्यकर्ता असलो तरी एक जबाबदार पुणेकर म्हणून ही बाब मांडत असल्याचे सांगत त्यांनी या प्रकरणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तात्काळ भूमिका स्पष्ट करून संबंधित त्रुटींवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## भागवत कथा म्हणजे भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा संगम

*भागवताचार्य सिद्राम महाराज काळे : आळंदीत संगीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन*

**आळंदी (दै. संध्या)**



"श्रीमद्भागवत कथा ही केवळ धार्मिक वाचन नसून ती भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा सुंदर संगम आहे. भागवत ऐकणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची ताकद या कथेच्या माध्यमातून मिळते," असे प्रतिपादन भागवताचार्य ह.भ.प.सिद्राम महाराज काळे यांनी केले.

आळंदी नगरीत गं.भा. विमल (काकू) गोपाळ पाटील कुऱ्हाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संगीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात ते बोलत होते. त्यांच्या सुश्राव्य आणि रसाळ वाणीतून श्रीमद्भागवत कथेचे निरूपण होत असून कथेचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

कथेच्या माध्यमातून भागवत धर्माचे महत्त्व, भक्तीमार्गाची साधना तसेच जीवनातील सदाचार आणि आध्यात्मिक मूल्ये यांचे सोप्या शब्दांत विवेचन करण्यात येत आहे. सिद्राम महाराज काळे यांच्या प्रभावी कथनशैलीमुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध होत असून वातावरण भक्तीरसाने भारावून गेले आहे. संगीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ या सोहळ्याचे आयोजन ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे व परिवाराच्या वतीने करण्यात आले असून वारकरी, भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथेचा लाभ घेत आहेत. आयोजकांनी अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.भैरवनाथ महाराज उत्सव मंडळाचे अध्यक्ष शंकरराव कुऱ्हाडे यांनी केले आहे.

## खैरावमधील समाधान शिबिरात ९८ प्रकरणे निकाली

**खैराव (दै. संध्या)**

दारफळ महसूल मंडळातील खैराव (ता. माढा) गावात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरात ९८ प्रकरणे तहसीलदार संजय भोसले यांनी निकाली काढली.

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराचे शनिवारी (ता. ७) आयोजन केले. शिबिराच्या अध्यक्षस्थानी सरपंच जानकीबाई मस्के होत्या. शिबिरास तहसीलदार संजय भोसले, उपसरपंच पंडितराव पाटील, माजी सरपंच विलासराव देशमुख, नायब तहसीलदार पांडुरंग भडकवाड तसेच पुरवठा नायब तहसीलदार प्रीतम पवार उपस्थित होते.

शिबिराचे प्रास्ताविक ग्राममहसूल अधिकारी एस. एस. कोंडगुळे यांनी केले. पांडुरंग भडकवाड यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये विविध महसुली कामे, प्रमाणपत्रांचे वितरण तसेच ग्रामस्थांच्या अडचणींचे निराकरण केले. शिबिरात १० फेरफार, सात सातबारा, ४६ सातबारा व आठ अ डिजिटल, २४ विविध प्रमाणपत्रे, तीन विविध अर्ज, आठ अकृषक नोंदी करण्यात आल्या. मानेगावचे ग्राममहसूल अधिकारी ए. एस. धवन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पारंपारिक पद्धतीने कवठे येमाई येथे भव्य शिवजयंती उत्सव

**कवठे येमाई (दै. संध्या)**



महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार शिवजयंती शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व ग्रामस्थांच्या सहभागातून अत्यंत उत्साहात व पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. शिरूर ग्रामीण भागातील सर्वात मोठ्या शिवजयंती उत्सवांपैकी एक म्हणून या कार्यक्रमाने विशेष आकर्षण मिळवले. या उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक व समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिर, शिवतांडव शो, बाहुबली हनुमान देखावा, छावा जिवंत देखावा, प्रभू श्रीराम मूर्ती देखावा, नवज्योत ढोल पथकाचे वादन, सह्याद्री मर्दानी आखाड्याचे खेळ, पालखी सोहळा, नवखंड लाईट शो, पेपर ब्लास्टर, "कवठ्याचा टेडी" तसेच अघोरी साधूंच्या शिवभक्तीचा देखावा अशा कार्यक्रमांनी वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या महा आरतीने,महाराजांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित "वीर छावा" नाट्यप्रयोग आणि अघोरी शैलीतील शिवतांडव हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. मिरवणुकीची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान मासानिमित्त पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या कार्यक्रमाला जि.प. सदस्य राजेंद्र दादा गावडे, पंचायत समिती सदस्या सौ. कांचनताई सांडभोर, राजेशभैय्या सांडभोर, सुनीलभैय्या वागदरे, निखिल गोसावी (महाराष्ट्र पोलीस), अभिजीत सांडभोर, नवा वागदरे, पवनराजे जाधव, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक अजिंक्य तारू आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान जि.प. सदस्य राजेंद्र गावडे यांनी कवठे येमाई येथील बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचे संघटन व नियोजन कौतुकास्पद असल्याचे सांगितले. बेट भागातील नागरिकांनीही या भव्य शोभायात्रेचे मोठ्या प्रमाणात स्वागत व कौतुक केले.

कार्यक्रमासाठी टाकळी हाजी पोलीस स्टेशन औट पोस्टचे सहायक पोलीस निरीक्षक कारंडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तसेच मर्दानी खेळांचे सादरीकरण अक्षय पवार, विक्रांत रणसिंग व राष्ट्रीय पंच शौकत मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली बेटभागातील विद्यार्थिनींनी केले.

या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बजरंग दलाचे संदीप भोर, श्रेयस गायखे, रितेश भोर, सचिन माकर, सचिन गोसावी, सागर सांडभोर, साहिल सांडभोर, किरण पडवळ, कालिदास शेटे, संतोष गोसावी, निखिल लांघे यांसह गावातील सर्व कार्यकर्त्यांनी महिनाभर परिश्रम घेतले. कार्यक्रमास विशेष सहकार्य पंचायत समिती सदस्य राजेशभैय्या सांडभोर यांचे लाभले. पारंपारिक रूढी-परंपरेनुसार आणि उत्साहात हा भव्य शिवजयंती उत्सव यशस्वीपणे पार पडल्याची माहिती बजरंग दल ग्रामीण सहसंयोजक सुरेश साबळे यांनी दिली.